रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ७६
www.ramprahar.com

मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

रायगड जिल्ह्यात निकुष्ठ मित्र उपक्रमास सुरुवात/२

सुधागडात आढळला दुर्मिळ फोर्स्टेन मांजऱ्या साप/५

जिल्हास्तरीय तलवारबाजीत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश/८

## पक्षासाठी अधिकाधिक वेळ द्या –उपमुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई** : भाजपकडून आगामी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २) मुंबईत विस्तारकांना मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी पक्षासाठी अधिकाधिक वेळ देणे आवश्यक असल्याचे म्हटले. सर्वांनी स्वतःसाठी १० तास, तर पक्षासाठी १४ तास द्या. गाव, तालुका, जिल्हा पातळीवरील प्रभावित व्यक्तींना संपर्क करा तसेच पुढील एका वर्षाचा रोडमॅप तयार करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी विस्तारकांना दिल्या. ते पुढे म्हणाले की, आपल्यासोबत शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष आले असले तरी राज्यात युतीमधील सर्व पक्षांमध्ये समन्वय साधत त्यांचे उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. पक्ष प्रथम आणि मी शेवटी हेच धोरण हवे. **(संबंधित वृत्त पान २ वर..)**

# मिशन मोडवर काम करा -मंत्री रवींद्र चव्हाण

## उत्तर रायगड जिल्हा भाजपची कार्यसमिती बैठक उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रत्येक राजकीय लढाई जिंकायची आहे आणि ती जिंकण्यासाठी ताकदीने उतरायचे आहे. विजय एवढा मोठा असला पाहिजे की विरोधकाला हिंमत होता कामा नाही, त्यासाठी मिशन मोडवर काम करा, अशी सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि. २) येथे केली.

उत्तर रायगड जिल्हा भाजपची कार्यसमिती बैठक मंत्री रवींद्र चव्हाण तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्केट यार्ड येथे झाली. त्या वेळी मार्गदर्शन करताना मंत्री चव्हाण बोलत होते.

ना. चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना पुढे सांगितले की, कार्यकर्ता पक्षाचा कणा, तर बूथ कमिटी बलस्थान आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने राजकीय लढाई जिंकण्यासाठी सज्ज रहावे. काम करण्याच्या अनेक संधी आहेत, ज्या वेळी आपल्यातील कार्यकर्ता जिवंत राहतो त्या वेळी काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने संधीचे सोने करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. प्रत्येक मतदारसंघात भाजपला चांगले वातावरण आहे. मी प्रवासात पाहिले त्यानुसार कोकणात आपला पक्ष पॉवरफुल आहे. त्यामुळे प्रत्येकाने महाविजय २०२४साठी सज्ज रहावे.

या वेळी प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर यांनी, पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी उत्तर रायगड जिल्हा यशस्वीपणे पार पाडत असल्याचे अधोरेखित केले. शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी म्हटले की, भाजपसारखी रचना अन्य कोणत्याही पक्षात दिसत नाही. मेहनती कार्यकर्ते या पक्षात आहेत आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व संधी तसेच जबाबदारीने काम करणारा हा पक्ष आहे. मी आमदार होण्यामध्ये मंत्री रवींद्र चव्हाण व भाजपच्या कार्यकर्त्यांचा मोठा वाटा आहे, असेही त्यांनी नमूद केले. आमदार निरंजन डावखरे यांनी पदवीधर मतदार नोंदणीसंदर्भात माहिती दिली व मार्गदर्शन केले, तर उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी मागील बैठकीचे इतिवृत्त विशद करून आढावा घेतला तसेच जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांना त्या संदर्भातील संघटनात्मक सूचना केल्या.

या वेळी उत्तर रायगड जिल्ह्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यामध्ये उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, उपाध्यक्ष जयंत पगडे, रामदास ठोंबरे, निळकंठ घरत, विठ्ठल मोरे, प्रिया मुकादम, सुभाष कदम, सनी यादव, चिटणीस चंद्रकांत घरत, ज्ञानेश्वर घरत, रमेश मुंडे, ब्रिजेश पटेल, विद्या तामखडे, किर्ती नवघरे, प्रदीप देशमुख, कोषाध्यक्ष अभिलाषा ठाकूर, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत, खोपोली रमेश रेटरेकर, खालापूर प्रवीण मोरे, उरण रवी भोईर, कामोठे रवींद्र जोशी, कळंबोली रविनाथ पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्ष बंडू शिद, फ्रेंडस् ऑफ बीजेपी संयोजक नितीन कांदळगावकर, आध्यात्मिक समन्वय आघाडी संयोजक काशिनाथ पारठे, सोशल मीडिया सेल संयोजक गायत्री परांजपे, आयटी सेल नितेश सोळंकी, भटके विमुक्त आघाडी संयोजक बबन बारगजे, सांस्कृतिक सेल संयोजक अभिषेक पटवर्धन, ट्रान्सपोर्ट सेल संयोजक सुधीर घरत, प्रज्ञा सेल संयोजक गीता चौधरी, आयुष्यमान भारत सेल संयोजक ज्योती देशमाने, बेटी बचाव बेटी पढाव संयोजक आरती तायडे, व्यापार आघाडी संयोजक कमल कोठारी, उत्तर भारतीय सेल संयोजक संतोष शर्मा, एनजीओ संपर्क आघाडीचे मंदार मेहेंदळे, शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष के.सी.पाटील, कायदा सेल अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, क्रीडा प्रकोष्ठ संयोजक विनोद नाईक, रेल्वे प्रवासी प्रकोष्ठ संयोजक उपेंद्र मराठे, पदवीधर प्रकोष्ठ संयोजक राजेश कदम यांना नियुक्ती प्रदान करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, विविध मोर्चा, सेल व प्रकोष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

### प्रदेशाध्यक्ष बावनकुळे १२ ऑक्टोबरला पनवेलमध्ये –आमदार प्रशांत ठाकूर

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, निश्चय आणि कृतीची जोड यशस्वीतेची खात्री देत असते. त्यामुळे प्रत्येकाने तशी वाटचाल केली पाहिजे. मनाशी खूणगाठ बांधून प्रत्येक दिवशी आपली जबाबदारी कर्तव्याने पार पाडण्यासाठी टार्गेट ठेवले पाहिजे. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत देदिप्यमान यश मिळवायचे आहे. त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सज्ज रहावे तसेच येत्या १२ ऑक्टोबरला आपले प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा पनवेल दौरा असून त्यामध्ये पदाधिकाऱ्यांची बैठक, नागरिकांशी संपर्क कार्यक्रम होणार असल्याची माहितीही त्यांनी या वेळी दिली.

## इंडिया आघाडीच्या मुंबईतील पदयात्रेत राडा

### कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये धुमश्चक्री; काही जण ताब्यात



**मुंबई : प्रतिनिधी**

इंडिया आघाडीने मुंबईत सोमवारी (दि. २) 'मीपण गांधी' पदयात्रा आयोजित केली होती, मात्र या यात्रेला गालबोट लागून पोलीस आणि आघाडीतील पक्षांचे कार्यकर्ते यांच्यात बाचाबाची झाली. या वेळी आमदार अबू आझमी यांच्यासह अनेक नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित इंडिया आघाडीची पदयात्रा मुंबईतील फॅशन स्ट्रीटजवळ पोहचल्यानंतर पोलिसांनी अडवली. त्यानंतर पोलीस आणि इंडिया आघाडीतील पक्षांचे कार्यकर्ते यांच्यात बाचाबाची झाली. या वेळी पोलिसांनी लावलेले बॅरिकेट्स तोडून आघाडीचे कार्यकर्ते आणि नेते पुढे चालू लागले. त्यामुळे पोलिसांकडून काँग्रेस, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष आणि कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची धरपकड सुरू झाली. पोलिसांनी समाजवादी पक्षाचे नेते नेते अबू आझमी यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि नेत्यांना ताब्यात घेतले.

इंडिया आघाडीने दक्षिण मुंबईतील मेट्रो सिनेमा ते महात्मा गांधी पुतळा अशी पदयात्रा काढण्याची परवानगी मागितली होती, पण हे शांतता क्षेत्र असल्याने तसेच उच्च न्यायालयाचे वेगवेगळे निर्बंध असल्याचे कारण देत या पदयात्रेला पोलिसांनी परवानगी नाकारली. त्यानंतर पोलिसांनी रीगल सिनेमा ते गांधी पुतळा या मार्गाने पदयात्रेची परवानगी दिली होती.

## निवडक

### ईशान्येकडील राज्यांत जाणवले भूकंपाचे धक्के

**नवी दिल्ली :** आसाम आणि मेघालयमध्ये सोमवारी (दि. २) संध्याकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.२ इतकी होती, तर केंद्रबिंदू मेघालयच्या उत्तर गारो हिल्समध्ये १० किलोमीटर खोलीवर होता. आसाम आणि मेघालयव्यतिरिक्त त्रिपुरामध्ये तसेच उत्तर बंगालच्या काही भागातही भूकंपाचे धक्के जाणवले. यात अद्याप जीवित वा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही, असे एनआयए वृत्तसंस्थेने म्हटले आहे.

## नांदेडच्या शासकीय रुग्णालयात २४ तासांमध्ये २४ रुग्णांचा मृत्यू

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात २४ तासांमध्ये २४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये १२ नवजात बालकांचा समावेश आहे. राज्याच्या आरोग्य संचालकांकडून याची चौकशी होणार आहे.

नांदेडच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची दररोजची ओपीडी साधारणत: दोन हजारांवर आहे. या ठिकाणी नांदेडसह हिंगोली, परभणी, यवतमाळ, वाशिम तसेच शेजारील तेलंगणा राज्यातून मोठ्या प्रमाणात रुग्ण येतात. अशातच २४ तासांमध्ये या रुग्णालयात २४ जणांचा मृत्यू झाला आहे.

दुसरीकडे रुग्णालय प्रशासनाने मात्र अत्यवस्थ असलेल्या आणि शेवटच्या क्षणी रेफर रुग्णांचा मयतांमध्ये समावेश असल्याचा दावा केला आहे. अधिष्ठाता डॉ.एस.आर.वाकोडे म्हणाले की, रुग्णालयात शेजारील चार ते पाच जिल्ह्यांतून रुग्ण येतात. अनेकजण खासगी रुग्णालयात उपचार घेतात. पैसे संपल्यानंतर शेवटच्या क्षणी ते शासकीय रुग्णालयात येतात. आलेल्या प्रत्येक रुग्णाला आम्ही दाखल करून घेतो. त्यामुळे मृत्यूचा आकडा मोठा दिसतो. औषधांचा तुटवडा आहे, परंतु औषधे नसल्याने रुग्णाचा जीव गेला, असे म्हणता येणार नाही.

## माणगावच्या टेमपाले गावात पाणी शिरले

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात रविवारी सायंकाळी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. टेमपाले गावात तर ढगफुटीसदृश पाऊस पडून डोंगरमाथ्यावरून पाण्याचा लोंढा आला आणि ग्रामस्थांच्या घरात पाणी शिरले.

टेमपाले येथे पहिल्यांदाच एवढे पाणी आल्याने ग्रामस्थांचे घरगुती सामान तसेच महत्त्वाची कागदपत्रे यांचे नुकसान झाले असल्याची माहिती माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते मजीद लोखंडे यांनी दिली.

## जंजिरा किल्ल्याचे दरवाजे अखेर उघडले

### पर्यटकांसह स्थानिक व्यावसायिक आनंदले



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पुन्हा एकदा पर्यटकांसाठी खुला झाला आहे. पुरातत्व विभागाने या किल्ल्याचे दरवाजे सोमवारी (दि. २) अखेर उघडले. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांनी आनंद साजरा केला, तर स्थानिक व्यवसायिकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जंजिरा किल्ला बंद असतो. हा किल्ला १ ऑक्टोबरला खुला करण्याचे पुरातत्व विभागाकडून जाहीर करण्यात आले होते, मात्र खराब हवामानामुळे किल्ला एक दिवस उशिरा सोमवारी खुला करण्यात आला. सकाळपासून हवामान पूर्ववत झाल्याने ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याकडे जाण्यासाठी शिडाच्या बोटीची वाहतूक सुरू करण्यात आली. सध्या पर्यटकांची संख्या तुरळक असून धिम्या गतीने वाहतूक सुरू आहे. राजपुरी नवीन जेट्टी ते जंजिरा किल्ल्यापर्यंत शिडांच्या बोटीद्वारे पर्यटकांची ने-आण केली जात आहे.

जंजिरा किल्ल्याला दरवर्षी लाखो पर्यटक देश-विदेशातून भेट देतात. ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात महाराष्ट्राच्या अनेक भागातील विद्यार्थ्यांच्या सहलींचीही येथे रेलचेल असते. पर्यटकांच्या आगमनामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होतो. किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी जेट्टीबरोबरच खोरा बंदर व दिघी बंदरावरून बोटसेवा उपलब्ध आहे.

## पनवेलमध्ये अवतरला 'लालबागचा राजा'

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी घेतले दर्शन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गौरा गणेशोत्सवानिमित्त पनवेल शहरातील भाजी मार्केट येथे महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक गौरा गणेशोत्सव मंडळातर्फे लालबागचा राजाच्या प्रतिकृतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या गणरायाचे महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी (दि. २) दर्शन घेतले आणि यानिमित्त आयोजित रक्तदान व चष्मेवाटप शिबिराला भेट देत शुभेच्छा दिल्या.

पनवेलसह रायगड जिल्ह्यात साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणपतीचे आगमन झाले. पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटना व फळभाजी विक्रेते सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ३० वर्षांपासून गौरा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. मुख्य गणेशोत्सव साजरा होत असताना गणरायासाठी आवश्यक असणारे साहित्य भक्तांना विक्री करण्यात येथील छोटे व्यवसायिक गुंतलेले असतात. त्यामुळे त्यांना गणेशोत्सवाचा आनंद घेता येत नाही. यासाठीच गौरा गणेश उत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली. ही परंपरा कायम आहे.

या बाप्पाचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दर्शन घेतले तसेच के.गो.लिमये वाचनालय आणि ग्रंथालयाच्या सभागृहात आयोजित रक्तदान शिबिराला भेट दिली. येथे जमा होणारे रक्त कॅन्सरग्रस्त व थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांसाठी खारघरच्या टाटा मेमोरिअल सेंटरच्या सहकार्याने संकलित करण्यात आले. त्याचप्रमाणे लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे चष्मेवाटप शिबिर घेण्यात आले. मंडळाच्या वतीने परेश ठाकूर यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला. या वेळी अध्यक्ष एस. के. नाईक, उपाध्यक्ष प्रल्हाद नाईक, सभासद अनंता कोळी, दिलीप अनभुले, सुनील गोरे, शिवाजी गाडे, महादेव खराते, महान नाईक, विजय मराठे आदी पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.




# लोकसभा निवडणुकीसाठी भाजपची जोरात तयारी

## पक्ष विस्तारकांच्या बैठका सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष जोरदार कामाला लागले आहेत. पक्ष संघटना वाढवण्यासाठी पदाधिकाऱ्यांवर नव्या जबाबदाऱ्या देत बैठकांचा सध्या धडाका सुरू आहे. यातच आता लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे.

महाराष्ट्रात लोकसभेसाठी भाजपने मिशन ४५ची घोषणा केलेली आहे. या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीत मिशन ४५ यशस्वी करण्यासाठी भाजपच्या लोकसभा आणि विधानसभा विस्तारकांची बैठक दादरच्या वसंतस्मृती सभागृहात घेण्यात आली.




भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी प्रशिक्षण वर्गात विस्तारकांना मार्गदर्शन केले, तसेच आगामी निवडणुकीच्या दृष्टीने भाजप रणनीती आखत आहे.

या वेळी कोणत्या मतदारसंघांत पक्षाची ताकद कमी आहे, त्या मतदारसंघांत पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांना वरिष्ठ मार्गदर्शन करण्यात आले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मार्गदर्शन करताना म्हटले की, पंतप्रधान मोदींच्या सर्व योजना तळागाळापर्यंत पोहचवण्याचे काम विस्तारकांना करायचे आहे असे आवाहनही त्यांनी केले. स्वतः साठी १० तास, तर पक्षासाठी १४ तास द्या. गाव, तालुका, जिल्हा पातळीवरील प्रभावित व्यक्तींना संपर्क करण्याचे आणि पक्षाची भूमिका, कार्य पोहचवण्याचे आवाहनही फडणवीस यांनी केले.

काही दिवसांपूर्वीच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे मुंबईत लालबाग राजाच्या दर्शनाला आले होते. त्या वेळी अमित शाहांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर सागर बंगल्यावर चर्चा केली होती. या चर्चेत प्रामुख्याने राजकीय घडामोडी आणि आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने बैठक झाली होती. यानंतर आता भाजपने लोकसभा आणि विधानसभा विस्तारकांचा प्रशिक्षण वर्ग घेण्यास सुरुवात केली आहे.

# पोलिसाला ३२.५० लाखांना गंडा

## फ्लॅट मालकाचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

सीवुड्स भागात राहणाऱ्या व्यक्तीने नवी मुंबई पोलीस दलातील पोलीस हवालदारासोबत फ्लॅट विक्रीचा व्यवहार करून त्यांच्याकडून ३२ लाख ५० हजार रुपये घेऊन त्यांना फ्लॅट न देता तो परस्पर दुसऱ्याच व्यक्तीला विकून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अरुण राघवा सालियन (वय ५३) असे या व्यक्तीचे नाव असून एनआरआय पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.




या प्रकरणातील तक्रारदार पोलीस हवालदार सीवुडस्, सेक्टर-४८मध्ये राहण्यास असून ते नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत, तर त्यांची फसवणूक करणारा अरुण सालियन सीवुड्स, सेक्टर ५०मध्ये राहतो. २०१८मध्ये अरुण सालियन याने सीवुड्स, सेक्टर-४२मधील इव्ही रेसीडेन्सी इमारतीतील त्याच्या मालकीचा फ्लॅट विक्रीसाठी काढला होता. त्या वेळी या पोलिसाने फ्लॅट विकत घेण्याची तयारी दर्शविल्यानंतर त्यांच्यात खरेदी-विक्रीचा ६३ लाख रुपयांचा व्यवहार ठरला. त्यानुसार त्यांनी एमअयोयुदेखील बनवून घेतला. पोलिसाने प्रथम पाच लाख रुपये रोख आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने असे एकूण ३२ लाख ५० हजार रुपये सालियन याला दिले.

त्यानंतर पोलिसाने फ्लॅटचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी अरुण सालियन याच्याकडे कागदपत्रांची मागणी केली, मात्र त्याने कागदपत्र देण्यास टाळाटाळ केली. कोरोनामुळे देशभरात लॉकडाऊन लागू झाल्यानंतरदेखील पोलिसाने सालियनला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने पोलिसाचे फोन घेणेदेखील बंद केले. पोलिसाने सीवुड्समधील इव्ही रेसीडेन्सी इमारतीतील घर गाठले असता अरुण सालियन याने फ्लॅट दुसऱ्याच महिलेला विकल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

या पोलिसाने सालियन याच्याकडे आपले पैसे परत मागितले असता, त्याने दोन महिन्यात ३० लाख रुपये देण्याचे कबूल करून १० लाख रुपयांचे तीन पीडीसी चेक दिले, मात्र चेक वटले नाहीत. मार्च २०२३मध्ये सालियन आणि पोलीस यांच्यामध्ये झालेल्या समझोता करारानुसार सालियन याने पोलिसाच्या पत्नीच्या नावे २० लाख रुपये देण्याचे मान्य करून त्यांना पीडीसी चेक दिला, मात्र तो चेकदेखील वटला नाही. त्यानंतर अरुण सालियन फसवणूक करीत असल्याचे लक्षात आल्यानंतर अखेर पोलिसाने एनआरआय पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली.

# भाजप वाघनखे आणत असल्याने पेंग्विन कुटुंबाच्या पोटात दुखते -आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे महाराष्ट्रात आणली जाणार आहेत. त्यासाठी सांस्कृतिक मंत्री इंग्लंडला रवाना झाले आहेत, मात्र ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी यावर प्रश्न उपस्थित केल्यानंतर भाजपकडून चोख प्रत्युत्तर देण्यात आले आहे.

भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार म्हणाले की, हा सर्व प्रकार हास्यास्पद आहे. ही वाघनखे भाजप आणत आहेत. त्यामुळे पेंग्विन कुटुंबाच्या पोटात दुखत आहेत. उद्धव ठाकरे गटाचे लोक वारंवार छत्रपती आणि त्यांच्या परिवाराबाबत प्रश्न उपस्थित करीत आहेत. छत्रपतींच्या शौर्यावर प्रश्न हे मतांसाठी उपस्थित करीत आहेत. त्यामुळे जनतेच्याही भावना दुखवल्या जातील. पबमधील विषयाचा थयथयाट रस्त्यावर करायचा नसतो. हे मला आदित्य ठाकरे यांना सांगायचे, असेही आशिष शेलार यांनी म्हटले.

शिवाजी पार्क येथील दसरा मेळाव्याबाबत शेलार म्हणाले की, संजय राऊत लिहिताना आणि बोलताना कोणतेही तारतम्य ठेवत नाहीत. त्यामुळे कुणीही बुद्धिमान व्यक्ती त्यावर उत्तर देणार नाही. दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क कुणाला द्यायचा हा निर्णय महापालिका घेईल, असेही ते म्हणाले.

# मोबाईल हॅक करून एक लाख ३४ हजारांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

मोबाईल हॅक करून एक लाख ३४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.




रोडपाली, सेक्टर १७ येथील विवेक बबन शिंदे यांचा शिल्पा मेडिकल सेक्टर १, कळंबोली येथे आहे. त्यांना पेटीएम खात्यावरील रक्कम मेडिकल चालू खाते यावर रक्कम ट्रान्सफर करीत असताना पेटीएम बँकेच्या खात्यावर काहीच रक्कम शिल्लक नसल्याचे दिसले. त्यांनी ट्रान्जॅक्शन हिस्टरी तपासली असता सहा वेळा त्याच्या खात्यावरून रक्कम ट्रान्सफर झाल्याचे दिसले. व झिरो बॅलन्स दिसून आला. त्यामुळे अज्ञाताने त्यांचा मोबाईल हॅक करून पेटीएम बँक खात्यातील रक्कम काढून घेतल्याचे दिसून आले. एक लाख ३४ हजार २०० रुपयांची फसवणूक करण्यात आली.

# पनवेलमध्ये रिक्षा-बसचा अपघात; सुदैवाने सर्व सुखरूप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील अमरधामसमोर सोमवारी (दि. २) सकाळी रिक्षा आणि एनएमएमटी बसमध्ये झालेल्या अपघातात रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झाले नाही.



एनएमएमटी बस (एमएच ४३ बीपी ८१४६) पनवेलच्या दिशेने जात होती. सोमवारी सकाळी १० वा. च्या सुमारास (एमएच ४३ बीएफ १४८४) ही रिक्षादेखील पनवेलच्या दिशेने खोपोलीकडे जात होती. दोन्ही वाहने अमरधामजवळ आले असता एनएमएमटी बस आणि रिक्षाचा अपघात झाला. या अपघातात रिक्षेचे मोठा नुकसान झाले आहे.

सुदैवाने प्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नाही. अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलीस आणि पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

# रायगड जिल्ह्यात निकुष्ठ मित्र उपक्रमास सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

आयुष्मान भव मोहिमेंतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणून जिल्ह्यात महात्मा गांधी जयंतीपासून रायगड निकुष्ठ मित्र उपक्रमास सुरुवात करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कुष्ठरोग निर्मूलनाकरीता जिल्हा कृती नियोजन आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार कुष्ठरोग निर्मूलनाचे उद्दिष्ट २०२७पर्यंत निर्धारित करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात २०२२-२३मध्ये ८४५ नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना उपचार देण्यात आले आहेत, तर २०२३-२४मध्ये आत्तापर्यंत वर्षात २८९ रुग्ण उपचार घेत आहेत.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार क्षयरुग्णांसाठी निक्षय मित्र उपक्रम देशात राबविला जात आहे. त्याच धर्तीवर रायगड जिल्ह्यात कुष्ठरुग्णांसाठी रायगड निकुष्ठ मित्र उपक्रम हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश अज्ञानामुळे कुष्ठरोगाबद्दल असणारा भेदभाव कमी करणे हा आहे. रायगड निकुष्ठ मित्र म्हणून पुढे आलेले स्वयंसेवक नियमित उपचार घेणाऱ्या कुष्ठरुग्णांच्या घरी जाऊन सदरील रुग्णाला अन्नाची टोपली भेट म्हणून देतात. यामध्ये प्रामुख्याने भात, धान्य, डाळी, फळे यांचा समावेश असतो.

अन्नाची टोपली दिल्यानंतर या रुग्णाच्या घरी, रुग्णासोबत बसून ते प्रातिनिधिक स्वरूपात चहा, नाश्ता, किंवा जेवण करतील. या करिता सर्वप्रथम रुग्णाची आणि रुग्णच्या नातेवाईकांची सहमती घेतली जाणार असून या चहापानासाठी रायगड निकुष्ठ मित्रा सोबत त्या गावातील लोकप्रतिनिधी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, शासकीय कर्मचारी उपस्थित राहतील. अशा प्रकारच्या चहापानामुळे कुष्ठरुग्णाबद्दल होणारा भेदभाव कमी होण्यास नक्की मदत होणार आहे.

रायगड निकुष्ठ मित्र म्हणून स्वतः जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे तसेच सहाय्यक संचालक आरोग्य (कुष्ठरोग) डॉ. प्रताप शिंदे यांनी आपल्या नावाची नोंदणी केली आहे. जिल्ह्यात आजपर्यंत १०९ रायगड निकुष्ठ मित्राची नोंदणी झाली आहे. जास्तीस्त जास्त स्वयंसेवकांनी रायगड निकुष्ठ मित्र म्हणून पुढे यावे आणि कुष्ठरोग दुरीकरणासाठी आपले योगदान द्यावे, असे आहवान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांनी केले आहे.

# भाजप अलिबाग तालुका अध्यक्षपदी उदय काठे



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या अलिबाग तालुका अध्यक्षपदी उदय काठे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उदय काठे भाजपचे ज्येष्ठ सदस्य आहेत. अलिबाग तालुका पंचायत समितीचे ते माजी सदस्य आहेत. काठे यांचा जनसंपर्क चांगला आहे. त्यामुळे त्यांची अलिबाग तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रायगड जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार, तालुका उपाध्यक्ष सुनील दामले, तालुका ओबीसीचे अध्यक्ष अशोक वारगे, तालुका युवा सरचिटणीस निखिल चव्हाण, तालुका सरचिटणीस देवेन सोनवणे, ज्येष्ठ नेते मंगेश माळी यांनी उदय काठे यांचे अभिनंदन केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय योजना विभाग व स्टाफ वेल्फेअर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २) जगाला अहिंसेचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि जय जवान जय किसानचा नारा देणारे माजी पंतप्रधान लाल बहाद्दूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या जयंती सोहळ्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी उपस्थित राहून दोघांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या जयंतीनिमित्त महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेविषयी प्रार्थना केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी उपस्थित राहून महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रा. प्रथमेश ठाकूर व समन्वयक, स्टाफ वेल्फेअर समिती प्रा. प्रतीक्षा पाटील यांनी केले, तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. करिष्मा कडव, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. राहुल कांबळे व प्रा. कावेरी घोगरे यांनी सहकार्य केले.




# खांबावरून पडून वीज कर्मचाऱ्याचा मृत्यू

**अलिबाग :** तालुक्यातील चोंढी विभागातील महावितरणचे कर्मचारी मुकुंदराज चाटे हे मुनवली येथे वीज खांबावर चढून काम करीत असताना खाली पडून त्यांचा मृत्यू झाला.

मुनवली येथील विद्युत खांबावर रविवारी (दि. १) दुपारी मुकुंदराज चाटे हे दुरुस्तीच्या कामासाठी चढले होते. त्या वेळी अचानक पोलवरून खाली कोसळून ते बेशुद्ध पडले. त्यांना त्वरित ग्रामस्थांनी जिल्हा रुग्णालयात नेले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर त्यांचे पार्थिव अंबेजोगाई येथे त्यांच्या मूळ गावी रवाना करण्यात आले. चाटे यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले, आई असा परिवार आहे.

# अलिबागमध्ये गौरा गणपती जल्लोषात विराजमान



श्री गणेश भाजी विक्रेते सामाजिक विकास मंडळ, अलिबाग




ठिकरुळ नाका मित्र मंडळ, अलिबाग





श्रीबागचा राजा, श्रीबाग नं.२, अलिबाग



श्री बापदेव लाईन बॉईज मित्र मंडळ, अलिबाग



चेंढरे ग्रामस्थ मंडळ, अलिबाग



युवा बापदेव मित्र मंडळ कुरुळ, अलिबाग

# तळोजा मध्यवर्ती कारागृहात कायदेविषयक जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

तालुका विधी सेवा समितीच्या वतीने तळोजा मध्यवर्ती कारागृहात कायदेविषयक जनजागृतीचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल तालुका विधी सेवा समिती, अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश जयराज वडणे यांनी या शिबिराचे अध्यक्षस्थान भूषविले. शिबिरात पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, खजिनदार ॲड. धनराज तोकडे, ऑडिटर ॲड. विशाल मुंडकर, सदस्य ॲड. भूषण म्हात्रे, सदस्य ॲड. अमित पाटील, सदस्या ॲड. छाया म्हात्रे उपस्थित होते.

संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी, देश सुजाण नागरिकांच्या जोरावर पुढे जातो. म्हणून आपले वर्तन कसे असायला हवे, आपली कर्तव्य काय असायला हवीत, जेणेकरून आपण राष्ट्रनिर्मितीत आपले सक्षम योगदान देऊन देश पुढे नेऊ शकू, असे मत व्यक्त केले.

मुख्य मार्गदर्शक म्हणून जेल ड्युटी कौन्सिल ॲड. महेश गुंजाळ यांनी उपस्थित बंदिवान कैद्यांना प्लि बार्गेनिंग, कैदी व न्यायालयीन कैदी त्यांचे हक्क, जामीनाची तरतूद अशा विषयांची मांडणी केली. ॲड. इंद्रजित भोसले यांनी जामीनसंदर्भात मार्गदर्शन केले. पी. एल. व्ही. शैलेश कोंडसकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास विधी समितीचे रिटेनर लॉयर ॲड. सुयश कामेरकर, ॲड. वैशाली भिंगारकर, ॲड. देशकर, ॲड. राकेश म्हात्रे आणि इतर नियुक्त वकील उपस्थित होते.



# नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्फे ग्रामसभा

## पनवेलमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून विविध कार्यक्रमांची माहिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष्मान भव: कार्यक्रमांतर्गत सोमवारी (दि. २) सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वतीने ग्रामसभा घेण्यात आली. या वेळी सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आयुष्मान भव कार्यक्रमांतर्गत घेण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती नागरिकांना दिली.



प्रत्येक स्तरावरील व्यक्तीला केंद्र शासनाच्या उत्कृष्ट दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी केंद्र शासनाने आयुष्यमान भव अभियान सुरू केले आहे. या अभियानांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या वतीने साप्ताहिक आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली क्रमांक १ ते ६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येक शनिवारी आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी या आरोग्य मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले .

या अभियानांतर्गत ३० डिसेंबरपर्यंत महिन्यातल्या पहिल्या शनिवारी असंसर्गजन्य आजार यामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनी आजार, दुसऱ्या शनिवारी संसर्गजन्य यामध्ये क्षयरोग, कुष्ठरोग, एचआयव्ही इत्यादींची तपासणी, तिसऱ्या शनिवारी माता बालतपासणी, यामध्ये गरोदर माता, प्रसुती झालेल्या मातांची तपासणी करण्यात येत आहे.

चौथ्या शनिवारी नाक, कान, घसा, सिकलसेल, दंतरोग, उपशामक सेवा,नेत्ररोग, त्वचा आजाराबाबतची विशेष सत्रे या आरोग्य मेळाव्यामध्ये घेण्यात येत आहे. या आरोग्य मेळाव्यामध्येच उपचार, संदर्भ सेवा याचबरोबर नागरिकांना आभा कार्ड, आयुष्यमान कार्ड नोंदणी वितरण याबाबतचे मार्गदर्शन करण्यात येत आहे, तसेच अवयव दान शपथ व नोंदणी, रक्तदान चळवळीविषयीची माहितीही देण्यात येत आहे.

### आजपासून क्षयरुग्ण शोधमोहीम

संशयित क्षयरुग्ण शोध मोहीम मंगळवारपासून सुरू होत आहे. या दरम्यान आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी घरोघरी भेटी देऊन हा कार्यक्रम करणार आहेत. नागरिकांनी या मोहमेंतर्गत सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे. क्षयरुग्णासाठी लागणाऱ्या सर्व तपासण्या व उपचार पालिकेतील सर्व आरोग्य केंद्रांत मोफत उपलब्ध आहेत.

## निवडक



### महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री जयंती

**उरण** : रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई या विद्यालयात गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष तथा कामगार नेते सुरेश पाटील यांनी केले, तर लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन उद्योगपती मारुती कंक यांनी केले. श्रीफळ राजन घरत यांनी अर्पण केले. या वेळी प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, निशिकांत सुतार, डी. पी. सोनावणे, मधुकर पाटील, रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, मुंगाजी मॅडम, लेखनिक पाटील, ठाकूर सर, ग्रंथपाल राम ठाकूर, पांडुरंग मुंबईकर, राजेश कांबळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

### रक्तदान आणि महाआरोग्य शिबिर



**पनवेल** : पश्चिम महाराष्ट्र करंजाडे यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान आणि महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून ७५ जणांनी रक्तदान केले आहे. सनराईज हॉस्पिटल करंजाडे, सीमीरा डायग्नोस्टीक्स करंजाडे, तेरणा मल्टीस्पेशालिटी आणि रिसर्च सेंटर नेरुळ, साई ब्लड बँक पनवेल यांनी सहभाग घेऊन नियोजन केले होते. डॉ.विक्रम पाटील, रामचंद्र महाडिक, ज्वालासिंग देशमुख, सचिन गोरड, अमित कांबीरे, अजित कदम आदींनी शिबिरासाठी विशेष मेहनत घेतली.

### पनवेल मनपामध्ये महापुरुषांना अभिवादन



**पनवेल** : महानगरपालिकेच्या मुख्यालयात सोमवारी (दि. २) राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहाद्दुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, तसेच मुख्यालयासमोरील गांधी उद्यानातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त गणेश शेटे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, कर्मचारी उपस्थित होते.

### दुधाच्या टँकरमधून डिझेलची चोरी

**पनवेल** : पार्क केलेल्या दुधाचा टँकरमधून डिझेलची चोरी केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महावीर जाधव हे दुधाच्या टँकरवर ड्रायव्हर म्हणून काम करतात. ते कामोठे जवाहर इंडस्ट्रीज सुविधा कोल्ड स्टोरेज येथे दूध घेऊन नेहमी येत असतात. त्यांनी दुधाचा टँकर कंपनीच्या गेटच्या बाहेर पार्क केला होता. काही वेळाने जाधव गाडी चालू करण्याचा प्रयत्न करीत होते, गाडी चालू होत नव्हती. त्यामुळे त्यांनी गाडी चेक केली असता गाडीचा डिझेलचा टँकमध्ये डिझेल शिल्लक नसल्याचे दिसले. त्यामुळे १५० लिटर डिझेल चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

### ट्रकमधील डिझेल चोरण्याचा प्रयत्न

**पनवेल** : ट्रकमधील डिझेलची चोरी केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खांदा कॉलनी येथील अशोक फुंदे यांच्या ट्रान्सपोर्टचा ट्रक घेऊन ते निघाले होते. ब्रेक डाऊनचा प्रॉब्लेम झाल्याने गव्हाण फाटा येथे ट्रक उभा केला व त्यानंतर ते ट्रकचे स्पेअर पार्ट घेऊन गेले. परतल्यावर त्यांना तीन जण पाईप लावून डिझेल काढताना दिसले. ते त्यांच्या दिशेने धावले असता त्यांनी दगड उचलून अंगावर धावून आले. फुंदे यांनी आरडाओरडा केल्याने ते चोरटे तेथून पळून गेले. याप्रकरणी तिघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पाणी मिळाल्याने करंजाडेतील रहिवाशांकडून सरपंचांचा सत्कार

**पनवेल : प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून करंजाडे सेक्टर-६ पाणी समस्याग्रस्त होते, मात्र आता तो प्रश्न भाजपच्या माध्यमातून सोडवल्याबद्दल सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे व ग्रामपंचायत सदस्यांची वाजत गाजत मिरवणूक काढून सोमवारी (दि. २) नागरिकांनी सत्कार केला.



पनवेल शहराला लागून असलेल्या करंजाडे गावात सिडकोने नवीन शहर वसवले. पनवेल व नवी मुंबईच्या तुलनने येथे घराच्या किंमती कमी असल्याने झपाट्याने नागरी वस्ती वाढली. सिडकोच्या इतर वसाहतींप्रमाणे अनेक समस्यांकडे सिडकोने दुर्लक्ष केले. येथे पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. सरपंच मंगेश शेलार, भाजप विभागीय अध्यक्ष कर्णाजी शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, नंदकुमार भोईर, इतर ग्रामपंचायत सदस्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. नवीन कनेक्शनची मागणी केली आणि वारंवार त्याचा पाठपुरावादेखील केला. गावाकरिता दोन कनेक्शन घेण्यात आले. त्यातील एक कनेक्शन तात्पुरत्या स्वरूपात सेक्टर-६करिता देण्यात यावे अशी आग्रही भूमिका घेतली.

भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व सरपंच मंगेश शेलार यांच्या विशेष प्रयत्नाने मागणी मंजूर होऊन काम पूर्ण झाले. त्यामुळे सगळ्यांना पुरेसे पाणी मिळू लागल्याने राम फाटे यांच्या पुढाकाराने सेक्टर ६मधील नागरिकांनी सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांची वाजत गाजत मिरवणूक काढून सत्कार केला.

**स्वच्छ, सुंदर व सर्व सोयींनीयुक्त करंजाडे बनवण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी आजच्या या सत्काराने आम्हाला ऊर्जा मिळाली.**
**-मंगेश शेलार, सरपंच**

**पाणी नसल्याने आमचे खूप हाल होत होते. टँकरचे पाणी घ्यावे लागायचे. आता नवीन कनेक्शनमुळे २४ तास पाण्याचे स्वप्न पूर्ण झाले. भाजपने आमची समस्या सोडविल्याने त्यांचे जाहीर आभार!**
**-छाया तोंडलेकर, रहिवासी महिला**

# भाजप अल्पसंख्याक मोर्चातर्फे स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा गांधी जयंती सप्ताहानिमित्ताने भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने पनवेलच्या हजरत पीर करम अली शाह दर्गावर स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर आणि प्रदेश सचिव बबलू सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने महानगरपालिका उद्यानातील महात्मा गांधी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला, तसेच दर्गावर चादर अर्पण करून दुवा मागण्यात आली. या वेळी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मन्सूर पटेल यांचा सय्यद अकबर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला भारावलेल्या मन्सूर पटेल यांनी समयोचीत विचार मांडले. त्यानंतर उपस्थित सर्वांनी सफाई केली. या वेळी सय्यद अकबर, बबलू सय्यद, अ‍ॅड. इर्शाद शेख, नासिर शेख, मोहसीन कर्नाळकर,तौफिक खांडे, ऍड.मेहबूब पटेल, नूर मुजावर, नविद पटेल, गफूर सय्यद, जरीना शेख व मुस्लिम महिला कार्यकर्ते उपस्थित होते.





**पनवेल** : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीचे मॅनेजिंग डायरेक्टर जयंत भगत यांच्या घरी विराजमान गौरा गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील तसेच मयूर कदम आदी उपस्थित होते.



**पनवेल** : खारघर येथील दिगंबर जैन सेवा ट्रस्टच्या वतीने रविवारी सेक्टर १९, न्यू जैन मंदिर येथे क्षमावाणी सभेचे आयोजन करण्यात अले होते. या वेळी जैन मंदिराजवळील मुख्य रस्त्याच्या चौकाचे नामकरण जैन मंदिर चौक असे करण्यात आले. त्याचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमासाठी भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, किरण पाटील, खारघर दिगंबर जैन सेवा ट्रस्ट चेअरमन आर. पी. जैन, सेक्रेटरी सचिन शहा, खजिनदार संजय सोनी, महिला मंडळ अध्यक्षा रितू जैन, महिला मंडळ खजिनदार स्नेहल शहा, जितू जैन, विपीन जैन, शैलेश जैन, प्रियांक जैन, अभिषेक जैन उपस्थित होते. (छाया : अक्षय शार्दुल)



**पनवेल : भाजप कार्यकर्ते अशोक आंबेकर यांना वाढदिवसानिमित्त उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तसेच कार्यालयीन कर्मचारी शेख उपस्थित होते.**





**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक अ‍ॅड. नरेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान खारघर सेक्टर १० बँक ऑफ इंडिया ते सिडको गार्डनपर्यंत राबविण्यात आले. मोहिमेसाठी जीवानंद झा, तुकाराम घोडके, रमेश रमान, दीपक नरलावर, के. एम. उपाध्याय, जयकुमार पांडे, सुरेंद्र जाधव, विलास सावंत, मोहन बिस्ट, नितीन पामकर, दिलीप पांचाळ, मीरा घुगे, नेहा यादव, जोत्सना पामकर, मनीषा जाधव, श्रुती नेमा, राजेंद्र सिंग, सिनियर असोसिएशन, लायन्स क्लब ऑफ खारघर कोपरा, आरएसएस संघ शाखा सेक्टर १०, भारतीय जनता पक्ष सेक्टर १० खारघर आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये या महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनाचा थोडक्यात परिचय करून दिला. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी व माणिकराव घरत, दयानंद खारकर व विद्यार्थी उपस्थित होते.



प्रारंभी जुनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी यांच्या हस्ते महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेचे तर माणिकराव घरत यांच्या हस्ते लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रयत सेवक दयानंद खारकर यांनी श्रीफळ अर्पण केले, तसेच ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी व इ. बारावीची विद्यार्थिनी तन्वी प्रकाश कोळी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयाच्या वतीने संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर व माणिकराव घरत यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

### श्रमदान शिबिर

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पूर्वदिनी स्वच्छता ही सेवा मोहिमेंतर्गत श्रमदान शिबिर आयोजित करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी वर्ग, शालेय परिसर आणि स्वच्छता प्रभात फेरी काढून या श्रमदान शिबिरामध्ये सहभाग नोंदवला. या वेळी विद्यार्थ्यांसह सर्व शिक्षक तसेच मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# बेभानपणातही दक्षता हवी

डीजेच्या तालावर बेभान होऊन नाचताना अकस्मात कोसळून होणारे मृत्यू असोत वा आवाजाच्या दणदणाटामुळे निर्माण होणारे श्रवणदोष की लेझरमुळे डोळ्यांना होणारी गंभीर स्वरुपाची इजा... या अशा घटनांची गांभीर्याने दखल घेऊन त्यासंदर्भात तज्ज्ञांमार्फत चौकशी होण्याची गरज आहे. वेळीच सुयोग्य नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली गेली तरच तरुणांना आयुष्यभराच्या आघातापासून वाचवता येईल.

**यंदाचा गणेशोत्सव सगळ्यांनीच अतिशय उत्साहात साजरा केला. गणेशोत्सवाची लोकप्रियता दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चालली असतानाच आपण तो पर्यावरणपूरकतेने साजरा करण्याची गरज आहे यावर राज्य सरकारच्या वतीनेही यंदा मोठा भर देण्यात आला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला तसे आवाहनही केले. जनतेमध्येही पर्यावरणपुरकतेविषयीची जागरुकता धीम्या गतीने का होईना पण वाढते आहे. एकीकडे हा सकारात्मक बदल घडून येत असताना दुसरीकडे उत्सवात आणि विसर्जन मिरवणुकांमध्ये डीजेच्या आवाजाच्या उच्च पातळीमुळे हृदयक्रिया बंद पडून एखाद्या तरुणास मृत्यू येणे किंवा कुणाला कायमस्वरुपी वा तात्कालिक बहिरेपण येणे अशा घटना समोर येऊ लागल्या आहेत. हे प्रकार अनेकांना चिंतेत टाकत असतानाच नाशिकमध्ये असे प्रकार किती टोकाचे नुकसान करू शकतात याचे भीषण वास्तव समोर आले आहे. तेथील विसर्जन मिरवणुकीतील डीजे डॉल्बी सिस्टिमसोबत असलेल्या लेझर लाइटमुळे मिरवणुकीतील सहा तरुणांच्या दृष्टीवर भयानक परिणाम झाल्याचे सोमवारपर्यंत डॉक्टरांच्या ध्यानात आले. ही संख्या वाढण्याची भीतीही व्यक्त होते आहे. चार दिवसांपूर्वीच सांगली येथे दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन तरुणांचा डीजेच्या आवाजामुळे मृत्यू झाल्याची बाब समोर आली होती. डीजेच्या दणदणाटामुळे कमकुवत हृदय असलेल्यांना हृदय बंद पडण्याचा धोका संभवतो असे दिसून आले आहे. यापूर्वीही अशा घटना घडल्याचे दिसले आहे व त्यामुळेच डीजेच्या आवाजावर मर्यादा घालण्यात आली. परंतु प्रत्यक्षात मात्र नियमांचे पालन होत नाही. डीजेच्या समीप नाचणाऱ्यांना पुढे काही तास ऐकू येत नाही. हृदयाची धडधड वाढते. अस्वस्थ वाटते. असा अनुभव अनेकांना येतो. पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र काही जणांच्या बाबतीत हे दुर्लक्ष जिवावर बेतणारे ठरते. डीजे सिस्टिमसोबत लेझर लाइटही काही ठिकाणी वापरले जातात. वापरणारे आणि त्या परिसरात त्या उत्सवाचा आनंद लुटणारे या दोहोंनाही त्यातून उद्भवणाऱ्या धोक्याची बहुदा कल्पना नसावी. अनंत चर्तुदशीच्या दिवशी नाशिकमध्ये विसर्जन मिरवणुकीत लेझर लाइटच्या थेट संपर्कात आल्यामुळे काही तरुणांच्या डोळ्यांना गंभीर स्वरुपाची इजा झाल्याचे आता उघडकीस आले आहे. शहरातील काही नेत्रविकारतज्ज्ञांकडे विशी-पंचविशीतील तरुण दृष्टिदोषाची तक्रार घेऊन गेले असता अधिक तपासणीत त्यांच्या नेत्रपटलावर रक्त साकळल्याचे आढळून आले. कुठलाही मार लागलेला नसताना वा वेल्डिंग पाहिलेले नसताना डोळ्यात भाजल्यासारख्या जखमा कशा असा प्रश्न डॉक्टरांना पडला, परंतु संबंधित तरुण डीजेच्या लेझर शोसमोर नाचल्याचे नंतर ध्यानात आले. संबंधित सर्व तरुणांमध्ये मोठा दृष्टिदोष आढळल्याचे दोघा नेत्रविकार तज्ज्ञांनी समाजमाध्यमांद्वारे जाहीर केल्यामुळे घडलेला प्रकार समोर आला आहे. डीजेच्या तालावर नाचताना कोसळून झालेले मृत्यू, अनेकांमध्ये निर्माण झालेला श्रवणदोष, तसेच लेझर लाइटमुळे डोळ्यांना झालेली गंभीर स्वरुपाची इजा या साऱ्या घटनांची गंभीर दखल घेऊन त्याची तज्ज्ञांमार्फत चौकशी होण्याची गरज आहे. संपूर्ण आयुष्यावर परिणाम करणारी ही हानी टाळण्यासाठी यासंदर्भात सुयोग्य नियमावली तयार करून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याची दक्षता घ्यायलाच हवी.**

# नागरिकांच्या ऑनलाइन तक्रारींचे निवारण होणार सुलभ

**नागरिक आणि प्रशासन यांना ऑनलाईन संवाद साधण्यासाठी सेतू निर्माण करणारा आपले सरकार २.० हा शासनाचा महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे तसेच पी. जी. पोर्टल हे केंद्र शासनाकडून हाताळण्यात येणारी कार्यप्रणाली आहे. राज्यातील नागरिकांना त्यांच्या तक्रारींचे ऑनलाईन पध्दतीने एकाच ठिकाणी निवारण करुन घेता यावे, हा या एकत्रिकरणाचा हेतू आहे. राज्यातील नागरिकांसाठी ऑनलाईन पध्दतीने तक्रार दाखल करता यावी तसेच प्रशासनाने ऑनलाईन पध्दतीने अशा तक्रारींचे निवारण करावे यासाठी आपले सरकार ही तक्रार निवारण प्रणाली मंत्रालयीन विभागांबरोबरच राज्यातील सर्व ३६ जिल्हयांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. ही तक्रार निवारण प्रणाली www.aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**

आपले सरकार ही तक्रार निवारण प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या प्रणालीचे प्रशासकीय व तांत्रिक दृष्टीकोनातून अद्ययावतीकरण करणे आवश्यक होते. त्यासाठी ऑनलाईन तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया, प्रशासनाकडून तक्रारींचे ऑनलाईन निवारण आणि वरिष्ठ कार्यालयांकडून या प्रक्रियेचे संनियंत्रण इ.संदर्भात शासनाने या प्रणालीच्या अंमलबजावणीसंबंधीची विहित कार्यपध्दती निश्चित केली आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचे क्र.संकीर्ण १५२२/प्र.क्र.१७८/लो.दि.क हे शासन परिपत्रक १८ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिले असून त्याचा संकेतांक क्र. २०२३०९१८१४५३५६६७०७ असा आहे. शासनाने आता आपले सरकार २.० या संगणकीकृत तक्रार निवारण प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे नवीन वैशिष्टे विहित केली आहेत. काय आहेत ही वैशिष्टे हे जाणून घेऊया या लेखातून...

नागरिक नोंदणी सुविधा :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) –नागरिक फक्त मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी वापरुन लॉग–इन करु शकतात. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – वैयक्तिक तपशिल व सोशल मीडिया लॉग–इन कॅप्चर करणे जसे की, फेसबुक.

क्षेत्रीय कार्यालयाची व्यापकता :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – जिल्हा टप्प्यात फक्त ४ प्रशासनाचा समावेश होता. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, पोलीस कार्यालय, महानगरपालिका. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – सद्य:स्थितीतील ४ प्रशासकीय कार्यालय सोडून इतर सर्व जिल्हास्तरावरील व तालुकास्तरावरील क्षेत्रीय कार्यालये.

अर्जदाराकडून स्मरणपत्र :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – स्मरणपत्राची सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – २१ दिवसात तक्रारीचे निराकरण न झाल्यास नागरिक संबंधित कार्यालयात ऑनलाईन स्मरणपत्र दाखल करू शकतात.

अधिकाऱ्याला ७व्या व १४ व्या दिवशी (Alert System) :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – तक्रार निवारण अधिकाऱ्याला तक्रार २१ दिवसांच्या आत निराकरण करण्यासाठी तक्रार आल्यापासून ७ व्या व १४ व्या दिवशी System -uto Generated पूर्वस्मरण दिले जाईल.

तक्रारीसाठी मजकूर आकार व सहपत्र :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – तक्रार दाखल करण्यासाठी २००० पर्यंत शब्दांची मर्यादा तसेच २ एम.बी. पर्यंत सहपत्र अपलोड करण्याची सुविधा. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – तक्रार दाखल करण्यासाठी ३००० पर्यंत शब्दांची मर्यादा तसेच ४ एम. बी. पर्यंत सहपत्र अपलोड करण्याची सुविधा.

एस्केलेट वैशिष्टचे :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – तक्रार निराकरण झाल्यानंतर अर्जदार समाधानी नसल्यास तक्रारदार वरिष्ठ स्तरावर पुन्हा तक्रार नोंदवू शकतात.

पदानुक्रम :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती)– मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच जिल्हास्तरावरील कार्यालये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, पोलीस कार्यालय, महानगरपालिका. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – मंत्रालयीन प्रशासकीय विभाग ते तालुकापर्यंत सर्व कार्यालये, सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख आपल्या अधिनस्त कार्यालयातील प्रकरण व अहवालांचे परिक्षण व आढावा घेऊ शकतात.

तंत्रज्ञान :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती)– Drupal 7.x Oo ठराविक पातळीपर्यंत स्केलेबल आहे. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – Cake PHP Oo Cf समवर्ती लॉग–इनला समर्थन देते.

लवचिकता :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – नवीन युजर तयार करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याला कमी लवचिकता होती. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – नवीन युजर तयार करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याला जास्त लवचिकता आहे.

पी.जी.पोर्टल(सी.पी.ग्राम) एकत्रिकरण :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – पी.जी. पोर्टल वरील तक्रार निवारण अधिकाऱ्याला आता एकाच लॉग–इन मध्ये पी.जी.पोर्टल व आपले सरकार वरील तक्रारी प्राप्त होतील.

एन.आर.आय. (अनिवासी भारतीय) नोंदणी सुविधा :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती)– कोणतेही अनिवासी भारतीय (एन.आर.आय.) तक्रार नोंदवू शकतात.

सूचना :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – नागरिक शासकीय योजनांसंबंधी किंवा कोणत्याही प्रशासकीय विभागांच्या धोरणासाठी सूचना दाखल करू शकतात.

मुख्यमंत्री हेल्पलाईन–एजंट लॉग–इन सुविधा :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – १८००१२०८०४० मुख्यमंत्री हेल्पलाईन वर आता तक्रार नोंदविता येईल.

फीडबॅक कॉल सुविधा :- आपले सरकार १.० (सद्य:स्थितीतील कार्यपध्दती) – सुविधा नाही. आपले सरकार २.० (सद्य:स्थितीतील नवीन प्रणालीनुसार कार्यपध्दती) – प्रशासकीय सुधारणा व रचना कार्यपध्दती या उपविभागाकडून तक्रार निवारण झाल्यानंतर तक्रारदाराला अकस्मातपणे तक्रार निवारण करण्याबद्दल विचारणा करण्यात येईल व त्याबाबतचा मासिक अहवाल वेळोवेळी प्रशासकीय विभागांच्या निदर्शनास आणण्यात येईल.

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी मुख्य सचिव यांच्या स्तरावरुन तक्रारींचा आढावा घेण्यात येईल. १८ सप्टेंबर, २०२३ पासून आपले सरकार २.० अंमलात आल्यानंतर प्रलंबित तक्रारींचे जुन्या पोर्टलवरुनच निराकरण होईल, याची दक्षता संबंधित विभागांनी घेण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.

आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी कोणती तक्रार ग्राह्य धरण्यात यावी याबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाकडून (पीएमओ कार्यालय) प्राप्त झालेल्या कार्यनियमावली दिलेल्या आहेत. या कार्यपध्दतीचा अवलंब केल्याने तक्रार दाखल करणे व त्या तक्रारीचे विहीत कालावधीत निवारण करणे सहज सुलभ होणार आहे.

**–मनोज शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी,
ठाणे




# एआय देईल शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे, सरकारचा उपक्रम



कृषी क्षेत्राला तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी मोदी सरकार सातत्याने नवनवीन पावले उचलत आहे. दरम्यान, पीएम किसान योजना सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित आणि अचूक उत्तरे देण्यासाठी एआय चॅटबॉट सुरू करण्यात आले आहे.


केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री कैलाश चौधरी यांनी पीएम किसान एआय चॅटबॉट लाँच केले. यामध्ये विविध भाषांमधील सुविधा देण्यात आल्या आहेत. दरम्यान, पीएम–किसान तक्रार व्यवस्थापन प्रणालीमध्ये एआय चॅटबॉट सादर करण्याचा उद्देश शेतकऱ्यांना सुलभ आणि सोपा व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे.

कृषी सचिव मनोज आहुजा आणि अतिरिक्त कृषी सचिव प्रमोद मेहराडा यांच्या उपस्थितीत कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री कैलाश चौधरी यांनी एआय चॅटबॉट लाँच केले. कार्यक्रमादरम्यान, अतिरिक्त कृषी सचिव प्रमोद मेहराडा यांनी चॅटबॉटची वैशिष्ट्ये आणि शेतकऱ्यांसाठी ते कसे फायदेशीर आहे, याबद्दल सविस्तर सांगितले.

निवेदनानुसार, चॅटबॉट सध्या इंग्रजी, हिंदी, बंगाली, उडिया आणि तामिळ भाषेत सुरु करण्यात आले आहे. लवकरच देशातील सर्व २२ अधिकृत भाषांमध्ये उपलब्ध होईल. एकस्टेप फाउंडेशन आणि भाशिनी यांच्या मदतीने हा चॅटबॉट विकसित आणि सुधारला जात आहे. एआय चॅटबॉट त्याच्या विकासाच्या टप्प्यात शेतकऱ्यांना त्यांच्या अर्जाची स्थिती, पेमेंट तपशील, अपात्रतेची स्थिती आणि इतर योजना–संबंधित अद्यतनांची माहिती मिळविण्यात मदत करेल.

दरम्यान, मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, एआय चॅटबॉट लाँच हे पीएम–किसान योजनेची कार्यक्षमता आणि पोहोच वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. तसेच, यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नांची त्वरित, स्पष्ट आणि अचूक उत्तरे मिळतील.

# शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ



**निमित्त**

स्वामी रामानंद तीर्थ यांचा आज स्मृतिदिन. स्वामी रामानंद हे स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते, शिक्षणतज्ज्ञ, विद्वान व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकटेश भगवान खेडगीकर होते. त्यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९०३ रोजी कर्नाटकातील सिंदगी येथे कर्मठ ब्राह्मण कुटुंबात झाला. वडील भगवानराव प्राथमिक शाळेत शिक्षक होते. रामानंदांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी झाले. त्यांनी एका राष्ट्रीय विद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा दिली आणि पुढे अमळनेर व पुणे येथील महाराष्ट्र विद्यापीठातून इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांसह बी. ए. व एम. ए. पदवी संपादन केली. त्यानंतर १९२६ मध्ये ना. म. जोशी यांच्या स्वीय सहाय्यकपदी ते रुजू झाले.

त्यामुळे आपाततः गिरणी कामगारांच्या लढ्यात ते सक्रिय सहभागी झाले. ना. म. जोशींनी स्वामीजींना कामगारविषयक विधेयकाची माहिती घेण्यासाठी ऐन हिवाळ्यात दिल्लीला पाठविले. नंतर त्यांनी अध्यात्माची कास धरली. आपल्या जन्मनावाचा त्याग करून भिक्षुकी अंगीकारली. त्यानंतर हिप्परगा (तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद) येथे लखनौस्थित स्वामी नारायण यांच्याकडून संन्यासदीक्षा घेऊन ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. त्यांनी हिप्परगा येथे १९३० मध्ये राष्ट्रीय विचारांच्या प्रचारार्थ शिक्षण संस्था काढली. सहा–सात वर्षे राष्ट्रीय बाण्याने हे कार्य केल्यानंतर ते १९३५ मध्ये सक्रिय राजकारणात सहभागी झाले आणि याच सुमारास आंबेजोगाई येथे योगेश्वरी नूतन विद्यालयात शिक्षकाची नोकरी धरली. पुढे ते मुख्याध्यापकही झाले.

नंतर त्यांनी नांदेड येथे १९५० मध्ये नांदेड एज्युकेशन संस्थेची स्थापना केली आणि नांदेड शहरात पीपल्स कॉलेज काढले. त्यानंतर त्यांनी १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांत गुलबर्गा मतदारसंघातून निवडणूक लढवून संसदेत प्रवेश केला. १९५३ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी हैदराबाद राज्याच्या विभाजनाचा प्रश्न प्रभावीपणे मांडला. अशा या कर्तृत्ववान शिक्षणतज्ज्ञाचे २२ जानेवारी १९७२ रोजी निधन झाले.

एस. एम. जोशींनी 'प्रादेशिक ऐक्य व लोकशाहीसाठी स्वामीजींचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहावे लागेल' असा त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.स्वामींच्या स्मृतिप्रीत्यर्थ नांदेड येथील विद्यापीठाला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ असे नाव दिले आहे.व्यंकटराव डावळे प्रतिष्ठान व राज्य सरकार यांच्यातर्फे अंबाजोगाई येथे चालविल्या जाणाऱ्या महाविद्यालयाला स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय असे नाव दिले आहे. उस्मानाबाद येथे स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला चालवली जाते.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**सुधागड : डॉ. माया सुधीर मल्होत्रा या प्रगतशील शेतकरी महिलेने तिवरे येथील अष्टविनायक फार्ममध्ये शेतीत अनेक प्रयोग करीत आर्थिक उन्नती घडवून आणली आहे.** (छाया : धम्मशील सावंत)

## आरोग्य प्रहर

# हृदयरोग टाळण्यासाठी रोज इतक्या पायऱ्या चढा



बदलत्या राहणीमानामुळे लोकांना हृदयासंबंधी आजार होण्याचे प्रमाण वाढतच चालले आहे. गेल्या काही वर्षांत कमी वयातील मुलांना देखील हार्टअटॅक येऊन त्यांना ऐन उमेदीत मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. बैठे काम आणि आहाराच्या चुकीच्या सवयी याचा परीणाम आरोग्यावर होत आहे. एका नव्या संशोधनात हृदयरोगाचा धोका कमी करायचा असेल तर दररोज ठराविक पायऱ्या चढणे गरजेचे आहे. काय आहे नेमके संशोधन ते पाहूयात

### तुलाने युनिव्हर्सिटीचे संशोधन

तुम्हाला जर हृदयरोगापासून दूर रहायचे असेल तर दैनंदिन रोज पायऱ्या चढणे आणि उतरणे व्हायला हवेच. लिफ्टचा वापर ठरवून बंद करायला हवा. रोज किमान ५० पायऱ्या चढल्या तर तुम्हाला हृदय रोगाचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी होईल. अमेरिकेतील लुईसियाना येथील तुलाने युनिव्हर्सिटीच्या अभ्यासात हा खुलासा झाला आहे. हा अभ्यास अहवाल एथेरोस्क्लेरोसिस जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे.

### काय म्हणतात संशोधक?

लुसियानातील तुलाने युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ पब्लिक हेल्थचे प्रोफेसर डॉ. लू. क्यूई यांनी म्हटले की उंच पायऱ्या चढणे हे कार्डीओ रेस्पिरेटरी फिटनेस आणि ल्युपिड प्रोफाईलमध्ये सुधारणा करण्याचा उत्तम मार्ग आहे. खासकरुन ज्या लोकांना व्यायाम करायला मिळत नाही त्यांच्यासाठी हा चांगला उपाय आहे.

### साडेचार लाख वयस्काचा डाटा एकत्र केला

या संशोधनात सुमारे ४ लाख ५० हजार वयस्कांचा एकत्र केलेल्या युके बायोबँक डाटाचा वापर केला गेला आहे. अभ्यासात सहभागी असलेल्या उमेदवारांच्या कुटुंबाचा इतिहास, सध्याचे आजार आणि आनुवंशिक आजाराचे धोके याच्या आधारे हृदयरोगासंबंधी संवेदनशीलतेची मोजणी केली. तसेच उमेदवारांना त्यांची जीवनशैलीतील सवयी आणि जिने चढण्याचे प्रमाण याचे सर्वेक्षण केले गेले. त्यातील निष्कर्षात आढळले की दररोज अधिक जिने चढल्याने विशेष रुपाने त्या लोकांना हृदयरोगाचा धोका कमी झाला जे कमी संवेदनशील होते.

## निवडक

### औद्योगिक सुरक्षा दलातर्फे स्वच्छता



**चौक** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत केंद्रिय औद्योगीक सुरक्षा दलाच्या डेप्युटी कमांडंट विनोद दबडे यांच्या नेतृत्वाखाली ५० जवानांनी खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली हद्दीत स्वच्छता अभियान राबविले. ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली येथे सरपंच पूजा तवले, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोळार, सीआयएसएफ इन्स्पेक्टर डी. एस. यादव, ग्रामस्थही मोहिमेत सहभागी झाले होते.

### माणगावात अमृत कलश शोभायात्रा



**माणगाव** : भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्त नागरपंचायतीतर्फे माझी माती माझा देश अंतर्गत शनिवारी (दि. ३०) अमृत कलश शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेची सुरुवात नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते कलशामध्ये माती टाकून करण्यात आली. शोभायात्रेत भाजपच्या पंचायतराज व ग्रामविकास कोकण विभाग संयोजिका शर्मिला सत्वे, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, पाणीपुरवठा सभापती कपिल गायकवाड, स्वच्छता सभापती दिनेश रातवडकर, माजी स्वच्छता सभापती अजित तारळेकर, स्वीकृत नगरसेवक सिराज परदेशी, माजी स्वीकृत नगरसेवक हेमंत चंद्रकांत शेट, मुख्याधिकारी संतोष माळी, नगरपंचायतीचे कर्मचारी, अशोकदादा साबळे विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एम. जाधव, पत्रकार मजिद हाजिते, व्यापारी, ग्रामस्थ विद्यार्थी, सहभागी झाले होते.

### हिरवळ महाविद्यालयातर्फे स्वच्छता



**माणगाव** : महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छ भारत अभियानांतर्गत हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, ग्रामपंचायत चांभारखिंड, जय भवानी ग्रामस्थ व महिला मंडळ, अथर्व मित्र मंडळ नवीन वसाहत चांभारखिंड, श्री सदस्य, संत निरंकारी मंडळ, राजिप शाळा चांभारखिंड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १) हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व रात्र महाविद्यालय, महाडच्या राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मंदार पिंगळे, प्रा. ऋजुता विद्वंस आणि प्रा. कपिल जोशी यांच्या उपस्थितीत चांभारखिंड परिसरात स्वच्छता अभियान राबविले. या वेळी सरपंच दीपक शेडगे, उपसरपंच समीर पेंढारी, ग्रामसेवक एस. टी. चीले, ग्रामपंचायत सदस्य गणेश खांबे, मुंबई विद्यापीठाचे आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग रायगड जिल्हा समन्वयक लियाकत परदेसी उपस्थित होते.

### पिगोंडे ग्रामपंचायतीतर्फे स्वच्छता अभियान



**नागोठणे** : पंतप्रधान गाव स्वच्छता अभियान अंतर्गत रविवारी (दि. १) नागोठणेजवळील पिगोंडे ग्रामपंचायतीतर्फे एक तास स्वच्छता अभियान सरपंच संतोष कोळी यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. या स्वच्छता अभियानात उपसरपंच कांचन माळी, ग्रामसेवक विजय अहिरे, ग्रामपंचायत सदस्य, आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे, डॉ. विकास शिंदे, प्राथमिक शाळेतील शिक्षक व शिक्षिका, अंगणवाडी सेविका, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व ग्रामस्थांनी सहभाग घेतला.

# रानमाळावर उगवलेल्या गवतामुळे चाऱ्याचा प्रश्न मार्गी

## पशुपालकांमध्ये समाधानाचे वातावरण

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकणातील शेतकरी शेती व्यवसायाबरोबर पशुपालन करीत असल्यामुळे पशुपासून मिळणाऱ्या उत्पन्नापासून आर्थिक सुबत्ता मिळवित आहेत. घरासमोर पशुधन असल्याने त्याचा उपयोग शेतीसाठी आणि दुग्ध व्यवसायासाठी होत असतो. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गवत निर्माण झाल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.



पावसाळा संपला की, पशुधन पाळणे शेतकऱ्यांना मोठ्या कष्टाचे होते कारण पावसाळ्यात निर्माण झालेले गवत उन्हाळी सुकून जाते आणि शेतकऱ्याला या सुकलेल्या गवताचा पेंढा म्हणून उपयोगात येत असते, परंतु दरवर्षी उन्हाळ्यात काही व्यक्ती डोंगराळ भागात वणवे लावत असल्याने सुकलेले गवत जळून खाक होते. यामुळे गुरांना उपासमारीची वेळ निर्माण होत असते.

दरवर्षी पावसाळ्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गवत निर्माण होत असल्याने गुरांचा चार महिने चाऱ्याचा प्रश्न सुटतो. शिवाय मुबलक चारा मिळत मिळत असल्याने दुग्ध व्यवसायही तेजीत असतो.

त्याचबरोबर अनेक ठिकाणी असलेले जलाशय पाण्याने पूर्ण भरले असल्यामुळे, पिण्याचा पाण्याचा प्रश्नही मार्गी लागत असतो. यामुळे पावसाळ्यात गुरे पाळणे सोयस्कर होते, परंतु आठ महिने मोठ्या कष्टाचे काढावे लागतात, अशी खंत गुरे चारण्यासाठी माळरानावर आणलेल्या शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## छायाचित्रकारांनाही महत्त्व द्यावे -सुधीर नाझरे

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर चित्रकारांसारखे कार्य छायाचित्रकारांचेदेखील आहे. त्यामुळे छायाचित्रकारांनासुद्धा महत्त्व द्यावे, असे आवाहन राष्ट्रीय पातळीवरील छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी केले.

नेरळ फोटोग्राफर असोसिएशनकडून आयोजित कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना सुधीर नाझरे बोलत होते. नेरळ फोटोग्राफर असोसिएशन यांच्याकडून नेरळ येथील श्री साईबाबा संस्थान येथील सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष चेतन केळकर, सचिव दिलीप मसणे, खजिनदार मनोज भोईर, राजेश विभुते आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी कल्याण, डोंबिवली, कर्जत तालुका, खोपोली, पाली, पनवेल, रसायनी आदी भागातील छायाचित्रकार सहभागी झाले होते.

कार्यशाळेत मुंबई येथून निकॉन कंपनीचे सेल्स प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी नवीन कॅमेरे आणि त्यातील वेगवेगळे बदल यांची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे दिली, तर सुधीर नाझरे यांनी छायाचित्र काढण्याच्या पद्धती आणि नवीन यंत्रणेची माहिती दिली.




# सुधागडात आढळला दुर्मिळ फोर्स्टेन मांजऱ्या साप

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील खुरावले येथील मुकुंद जाधव यांच्या घरामध्ये दुर्मिळ प्रजातीचा साधारण साडेचार फूट लांब फोर्स्टेन मांजऱ्या साप आढळला. या सापाला सर्पमित्र संदीप जाधव यांनी सर्पमित्र अमित निंबाळकर व वनविभागाच्या मदतीने नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

हा साप घराच्या छताच्या पत्र्याखाली लोखंडी पाईपवर बसला होता. सर्पमित्र संदीप जाधव यांनी सांगितले की, हा निमविषारी गटात गणला जाणारा साप आहे. त्याचे डोके गोल कडा असलेले त्रिकोणी आकारचे असून मानेवर वाय किंवा गॅमा चिन्हासारखी खूण तसेच डोळ्याच्या बाहुल्या मांजराप्रमाणे तसेच उभ्या रचनेत असतात. याशिवाय या सापाच्या अंगावर मांजराच्या त्वचेसारखा रंग आणि चट्टे असल्याने हा मांजऱ्या साप किंवा कॅट स्नेक म्हणून ओळखला जातो.

हा सहज आढळणारा साप नसून हा झाडाच्या छिद्रात, घरट्यात, ढोलीत विशेषतः आढळतो.



**भक्ष्याच्या शोधात मानवी वस्तीत**

*सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या मांजऱ्या प्रजाती सापामध्ये कॉमन कॅट स्नेक (साधा मांजऱ्या साप) सर्वत्र आढळतो, पण फॉर्स्टेन कॅट काही विशिष्ट भागातच आढळतो. खुरावले येथे घरात पकडलेला हा साप पूर्ण वाढ झालेला सदृढ होता. शिवाय त्याने उंदीर खाल्ला होता. उंदराच्या शोधत तो घरात शिरला असू शकतो, अशी माहिती सर्पमित्र अमित निंबाळकर दिली आहे.*

## रोहे नवखार येथील ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील चणेरा विभागातील नवखार ग्रामस्थांनी खासदार सुनील तटकरे यांच्या गीताबाग निवासस्थानी भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली. गावातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

या वेळी राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत, वाशी उपसरपंच अरविंद मगर, सदस्य पांडुरंग हांबिर उपस्थित होते

खासदार सुनील तटकरे यांनी, आपणास पक्षात सन्मानाची वागणूक मिळेल असे आश्वासन देत गावातील समस्या सोडवणार असल्याचे सांगितले. नवखार ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष भास्कर भोईर, उपाध्यक्ष उद्देश बाळकृष्ण सरलेकर, खजिनदार यशवंत हरिश्चंद्र भोईर, सेक्रेटरी निरंजन राक्षीकर, कार्यकर्ते कल्पेश बठारे, चांगु सरलेकर, लक्ष्मण काशिनाथ सरलेकर, श्रीकांत सरलेकर आदी या वेळी उपस्थित होते.



## वडवळ येथे श्रमदान

**चौक : प्रतिनिधी**

स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत एक तास श्रमदान हा उपक्रम खालापूर पंचायत समितीच्या वतीने ग्रामपंचायत वडवळ येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला राजिप अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भालेराव, गटविकास अधिकारी संदीप कराड संदीप कराड, गटशिक्षणाधिकारी कैलास चोरमळे, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, महादेव शिंदे ग्रामसेवक प्रमोद पाटील, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. एक तास श्रमदान करून गाव परिसर, शाळा, अंगणवाडीची साफसफाई करण्यात आली व स्वच्छतेची शपथ घेण्यात आली.

## भाजप रोहा तालुकाध्यक्षपदी अमित घाग यांची नियुक्ती

**धाटाव : प्रतिनिधी**

दक्षिण रायगड युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य अमित घाग यांची भाजपच्या रोहा तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ही निवड प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रवींद्र पाटील व दक्षिण रायगड संघटक सतीश धारप यांच्या मान्यतेने दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी केली.



रोहा तालुका हा राजकीयदृष्ट्या केंद्रबिंदू मानला जातो. दक्षिण रायगड युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग धुरा सांभाळत असताना संघटनात्मक कामे, विविध सामाजिक उपक्रम राबवित किल्ला व तळवली दोन ग्रामपंचायतीमध्ये सरपंच तसेच रोठ बुद्रुक ग्रामपंचायतीवर सत्ता असून तिथे उपसरपंच भाजपचा आहे, तर ढोणखार, खैराले ग्रामपंचायतीत भाजपचे सदस्य निवडून आणून आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवली होती. नियुक्तीनंतर अमित घाग म्हणाले की, प्रामाणिकपणे काम करून पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम माझ्याकडून होईल, तसेच आगामी सर्व निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष पूर्ण ताकतीने उतरून तालुक्यात क्रमांक एकचा पक्ष असेल असा विश्वास व्यक्त केला.

## एक्स्प्रेस वेवर वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पुणेकडील लेनवर आडोशी उतारावर एका व्यक्तीला अज्ञात गाडीची धडक बसल्याने तो रस्त्याचे कडेला पडला. त्याला तातडीने खोपोली नगरपालिका हॉस्पिटलमध्ये आणले असता त्याला मृत घोषित केले. हा अपघात रविवारी मध्यरात्री १२.३० वा.च्या सुमारास घडला.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे वर (एमएच १२ बीसी १३५८)वरील चालक तेजस तांदळे (रा. पुणे) पुणेकडे जात असताना ट्रॅफिक जॅममुळे गाडी थांबली. त्याचा मित्र लक्ष्मीकांत अरुण चव्हाण (वय ३०) हा लघुशंका करण्यासाठी रोड क्रॉस करून मुंबई लेनकडे गेला होता. तो परतत असताना त्यास अज्ञात वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी झाला. त्यास उपचारासाठी खोपोली नगरपालिका हॉस्पिटल येथे पाठवण्यात आले, मात्र तेथे त्याला मृत घोषित करण्यात आले. घटनेची माहिती खोपोली पोलीस ठाणे येथे देण्यात आली आहे. महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाटचे पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे यांच्या टीमने या वेळी मदतकार्य केले.

## खोपोली भाजपकडून स्वच्छता अभियान



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत भाजप खोपोली शहराच्या वतीने रविवारी (दि. १) खालची खोपोली स्मशानभूमी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

भाजप शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर व राहुल जाधव अभियान प्रमुख कर्जत विधानसभा, संजय म्हात्रे अभियान प्रमुख खोपोली शहर यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमामध्ये स्वच्छतेची शपथ आणि माझी वसुंधरा शपथ सामुहिकरित्या घेण्यात आली. सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, गोपाळ बावस्कर, विकास खुरपडे, रमेश मोगरे, दिलीप पवार, सुर्यकांत देशमुख, कृष्णा पाटील, अनिल कर्णूक, राकेश दबके, वामनराव दिघे, रामभाऊ पवार, संजय कचरे, अजय इंगुळकर, हेमंत भाटिया, गिरीश अभाणी, गणेश ठाकरे, जयवंत वाघ, शमकरण राय, अश्विनी अत्रे, गीता मोहिते, सुमिता महर्षी, अस्मि सावरेकर व भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांनी या अभियानात सहभाग घेतला.

## रोहा तालुक्यात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी शहरासह ग्रामीण भागात रविवारी सायंकाळी विजेच्या कडकडाट होत सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. मुसळधार आलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

अशीच काहीशी परिस्थिती कोलाड, चणेरा, नागोठणे, सुतारवाडी, खांब, देवकान्हे, भालगाव, धाटाव, धामणसई,मेढा, सानेगाव,सुकेळी आदी आधी तालुक्यातील ग्रामीण भागात विजेच्या कडकडाटसह मुसळधार पाऊस पडला. सायंकाळी ५ वा. नंतर आकाशात ढग दाटून आले होते. मुसळधार आलेल्या पावसामुळे डोंगर माथ्यावरून ओढून आले. सोसायट्याचा वारा, मुसळधार पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाला.



# स्वच्छता अभियानासाठी लोकप्रतिनिधी, अधिकारी सरसावले



**कर्जत : प्रतिनिधी**

स्वच्छता पंधरवड्यांतर्गत रविवारी (दि. १) भाजपच्या वतीने शहरी भागात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. केवळ एका तासात शेकडो जणांनी स्वच्छता अभियानात सहभाग घेऊन परिसर स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, विद्यार्थी, श्रीसदस्य सहभागी होऊन स्वच्छता अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

तालुकाध्यक्ष राजेश भगत, किसान सेलचे कोंकण समन्वयक सुनील गोगटे, शहराध्यक्ष बळवंत घुमरे, सरस्वती चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल नगर, सेवालाल नगरमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. कर्जत पोलीस ठाण्याच्या परिसरात नगर परिषदेच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेवक शरद लाड, राहुल डाळिंबकर, भारती पालकर, सुवर्णा निलधे, प्राची डेरवणकर, गुरुकुल इंटरनॅशनल स्कुल चे शिक्षक व सुमारे शंभर विद्यार्थी तसेच मुद्रे, दहिवली व भिसेगाव - गुंडगे येथील बैठकीतील सुमारे ३०० श्रीसदस्य आणि नागरिक सहभागी झाले होते. त्यांनी पोलीस मैदान व परिसराची स्वच्छता केली.

या वेळी किरण ठाकरे, रमेश मुंढे, स्नेहा गोगटे, संजय कराळे, रमेश कदम, भगवान भोसले, विलास शिंदे, सुदाम म्हसे, प्रदीप मोरे, मिनेश मसणे, पोलीस कर्मचारी आदी उपस्थित होते.

कर्जत रेल्वे स्टेशनवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी यादव आणि रेल्वे सुरक्षा बलाचे अनिल वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक आशीर्वाद शिंदे, सहाय्यक निरीक्षक तानाजी सरकाळे, उपनिरीक्षक भाऊसाहेब कुरुंद, हवालदार राजेंद्र बागुल, प्रवासी संघटनेचे सुरेश खानविलकर, शिवसेवक गुप्ता, पाच पोलीस अंमलदार आणि २० होमगार्डनी स्वच्छता अभियान राबविले.

# दीड लाखाहून अधिक नवी मुंबईकरांचा स्वच्छतेत सहभाग

## ब्रँड अँबेसिडर पद्मश्री शंकर महादेवन यांचा सक्रिय सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

निश्चय केला, नंबर पहिला अशी स्वच्छता जिंगल गात स्वच्छ नवी मुंबई मिशनचे ब्रँड अँबेसिडर, सुप्रसिद्ध संगीतकार पद्मश्री शंकर महादेवन यांनी उपस्थितांचा उत्साह वाढवित स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत वाशी येथील मध्यवर्ती छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेकडो ज्येष्ठ नागरिकांसमवेत आयोजित केलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.



या वेळी पद्मश्री शंकर महादेवन यांचेसमवेत ऐरोली विधानसभा सदस्य आमदार गणेश नाईक, बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदा म्हात्रे, नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे राज्य संचालक नवनाथ वाठ, नमुंमपा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, शहर अभियंता संजय देसाई, समाजविकास विभागाचे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार, माजी नगरसेवक संपत शेवाळे व नेत्रा शिर्के तसेच इतर अधिकारी, कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर येथील किल्ले गावठाण परिसरात व आमदार रमेश पाटील यांनी घणसोली येथील शेतकरी शिक्षण प्रसारक संस्थेचे विद्यालय येथे स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये ज्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसह एकूण ७७५हून अधिक नागरिकांनी स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला. त्याचप्रमाणे सेक्टर ९ वाशी येथील मिनी सी शोअर परिसरात २५५ तृतीयपंथी नागरिकांनी स्वच्छता मोहीम राबवून नवी मुंबईच्या स्वच्छता कार्यात आमचाही सहभाग असे नवी मुंबईच्या एकतेचे दर्शन घडविले.

नवी मुंबईतील शाळा, महाविद्यालये, उद्याने, स्टेशन, डेपो, मार्केट, आरोग्य केंद्रे, नाला परिसर, पडीक जागा अशा महानगरपालिकेने निश्चित केलेल्या २६७ ठिकाणी तसेच इतर शासकीय व खाजगी कार्यालये, सोसायट्या, संस्था यांच्या वतीने करण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमांमध्ये एक लाख २८ हजारहून अधिक नागरिकांनी सहभाग घेत स्वच्छतेविषयी जागरूकतेचे व नवी मुंबईच्या एकात्मभावाचे दर्शन घडविले. टीएस चाणक्य सागरी प्रशिक्षण संस्थच्या परिसरातील सागरी किनाऱ्याशेजारील खारफुटी परिसरात आयकर विभागाच्या वतीने आयोजित स्वच्छता मोहिमेत मुख्य आयकर आयुक्त संजय कुमार यांचेसमवेत अभिनेते राजकुमार राव व सुनील ग्रोव्हर यांचेसह आयकर विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांनी उत्साही सहभाग घेतला.

## निवडक



### कर्तव्य २०२४ दैनंदिनीचे प्रकाशन

**नवी मुंबई** : भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या संकल्पनेतून निर्मिती करण्यात आलेल्या तीन डायरींच्या संचामधील तिसरी कर्तव्य डायरी २०२४चे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या वेळी आमदार गणेश नाईक, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक आदी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील विविध प्रांतात विविध कार्यक्रमांमध्ये केलेल्या भाषणांचे महत्त्वपूर्ण उतारे या दैनंदिनीमध्ये समाविष्ट आहेत.

### केबीपी कॉलेजमध्ये महात्मा गांधी जयंती



**नवी मुंबई** : रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून स्वातंत्र्यसेनानी दत्तात्रय गांधी उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक होत्या. महाविद्यालयात रविवारी शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. या वेळी सर्व सेवकांना डॉ. प्रणिता भाले यांनी स्वच्छता शपथ दिली. १०१ वयवर्ष असेलेले स्वातंत्र्यसेनानी दत्तात्रय गांधी यांनी महात्मा गांधीचे अखेरचे पर्व या विषयावर व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रास्ताविक स्वच्छता समितीचे चेअरमन डॉ. रमेश मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आबासाहेब सरवदे यांनी तर आभार प्रा. मनिषा जंगले यांनी मानले.

### जासई विद्यालयात स्वच्छता अभियान



**उरण** : रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई या विद्यालयात गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान पार पाडले. स्वच्छता मोहिमेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, कामगार नेते, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांनीसुद्धा स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, मुंगाजी मॅडम तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

### भाजपकडून द्रोणागिरीत साफसफाई

**उरण** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे स्वच्छतेसाठी एक तास अभियानांतर्गत भाजप द्रोणागिरी नोडच्या वतीने स्वच्छता अभियान उत्स्फूर्त राबविण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, उरण तालुका भाजप सरचिटणीस सुनील पाटील, उपाध्यक्ष पंडित घरत व कार्यकर्ते उपस्थित होते.



# एनएसएस स्थापना दिन आणि कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस आणि कर्मवीर भाऊराव पाटील जयंती दिनाच्या औचित्याने राष्ट्रीय सेवा योजना : एक सर्वांगिण विकासाचे व्यासपीठ, नोकरीच्या संधी व स्पर्धा परीक्षेची तयारी या विषयावर शनिवारी (दि. ३०) व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.



महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी, महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेऊन राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा महाविद्यालयातील एक विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबवण्यासाठी सतत कार्यशील असतो, असे नमूद केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत परकाळे यांनी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा समाजाभिमुख व महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये नेहमीच उत्स्फूर्तपणे कार्य करत असतो. त्याचबरोबर रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या शैक्षणिक प्रवासाबद्दल माहिती दिली.

प्रमुख वक्ते सुहास पाटील यांनी, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना नोकरीच्या संदर्भात जागरूक होणे खूप महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन केले, तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

इंगळे सर यांनी स्पर्धा परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आदिती कसारे व जान्हवी हातमोडे या स्वयंसेविकांनी राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा व्यक्तिमत्व विकासात कशा पद्धतीने मदत करतो हे सांगितले. आभार अधिकारी प्रा. राहुल पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, प्रा. अलोक भानुशाली, प्रा. राहुल पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. रूपाली पाटील व स्वयंसेविकांनी भूमिका बजावली.

# उरण येथे ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून उरण महिला सामाजिक शैक्षणिक व संसृतिक संस्था, लायन्स क्लब व द्रोणागिरी लायन्स क्लबच्या वतीने उरण नगर परिषदेचे विमला तलाव येथे रविवारी (दि. १) मोर्निंग वॉक कट्टातील ज्येष्ठ नागरिकांना भेटवस्तू देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

ज्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा ज्येष्ठ नागरिकांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे वाढदिवसही साजरा केला. या वेळी मोर्निंग वॉक कट्टाचे संस्थापक सुबोध दर्णे, उल्हास मोकाशी, प्रकाश पाटील, महिला सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेच्या संचालिका गौरी देशपांडे, अॅड. वर्षा पाठारे, गौरी मंत्री, सीमा घरत, संगीता पवार, दीपा मुकादम, लायन्स क्लबच्या अध्यक्ष नीलिमा नारखेडे, सदानंद गायकवाड, नरेंद्र ठाकूर, साहेबराव ओहाळ, ज्ञानेश्वर कोठावदे, प्रकाश नाईक, संजीव अग्रवाल, लायन्स क्लब द्रोणागिरीच्या अध्यक्ष सीमा घरत, सागर चौकर, आदित्य घरत, ओमकार घरत, सदस्य उपस्थित होते.



# सीकेटी महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी), चांगू काना ठाकूर महाविद्यालय रोटरी क्लब, नवीन पनवेल रोटरी क्लब, नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया क्लब, बँक ऑफ इंडिया खांदा कॉलनी शाखा आणि खांदेश्वर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १) स्वच्छ भारत अभियान व स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याच्या हेतूने रॅली काढण्यात आली.

अभियानात नॅशनल कॅडेट्स कौरचे ३२ एसडी आणि ३९ एसडब्लू असे एकूण ७१ कॅडेट्स सहभागी झाले होते. या अभियानांतर्गत खांदा कॉलनी, महाविद्यालय परिसर आणि शिव मंदिर खांदेश्वर परिसर स्वच्छ करून जनजागृती केली.

या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएट एनसीसी ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे, लेफ्टनंट प्रा. नीलिमा तिदार, ग्रंथपाल रमाकांत नवघरे, आणि कॅडेट्सनी परिश्रम केले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकुर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे दिघाटी येथे स्वच्छता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवा पंधरवाडानिमित्ताने स्वच्छता ही सेवा व महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे तालुक्यातील दिघाटी स्वच्छता अभियान राबवून श्री सदस्यांनी गावातील रस्ते, प्राथमिक शाळा, मंदिर, स्मशानभूमी रस्ते चकाचक केले.

डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील दिघाटी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ओला व सुका कचरा गोळा करून ठिकठिकाणच्या डंपिंग ग्राऊंडवर विल्हेवाट लावण्यात आली. या अभियानात ग्रामपंचायतीच्या सरपंच रजनी ठाकूर व ग्रामपंचायतीचे उसरपंच, सर्व सदस्य आणि श्रीसदस्य उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.



# भवानी फाउंडेशनतर्फे रक्तदान शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथे भवानी फाउंडेशतर्फे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. शिबिराला पी. पी. खारपाटील व अपोलो हॉस्पिटलचे अस्थीरोगतज्ज्ञ डॉ. सिद्धार्थ यादव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

एकूण १४६ युनिट रक्तसंकलन झाले. हे रक्त गरीब कॅन्सरच्या रूग्णासाठी उपयोगात येणार असल्याची माहिती भवानी फाउंडेशनने दिली. या वेळी भवानी फाउंडेशनचे संस्थापक कुसुमोदर शेट्टी, दीक्षित शेट्टी, सरिता शेट्टी, नवनीत शेट्टी, शिखा शेट्टी, धर्मपाल देवडिगा, पंडित नवीनचंद्र सुनील दिनेश शेट्टी, भवानी फाउंडेशनच्या सभासदांसह नागरिक उपस्थित होते.

# चिरनेरमधील महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी



**उरण : वार्ताहर**

चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्टी चतुर्थीनिमित्ताने सोमवारी भाविकांनी महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला.

ऐतिहासिक वारसा बरोबर चिरनेरच्या भूमीला प्राचीन देवस्थानचा परिस्पर्श झाला आहे. श्रींचे दर्शन घेण्यासाठी पहाटेपासूनच सुरुवात झाली होती, परंतु चिरनेर पंचक्रोशीत साखर चौथीच्या गणेशोत्सवाची धूम असल्याने, गणेशभक्तांची दर्शनासाठी काही प्रमाणात गर्दी कमी दिसून आली. या वेळी चिरनेर गावात सार्वजनिक साखरचौथ गणेश मंडळांनी प्रतिष्ठापना केलेल्या गणपती बाप्पांचे, गणेशभक्तांनी दर्शन घेतले, मात्र हार तसेच गावठी भाज्या व अन्य पदार्थांच्या विक्रीवर फारसा परिणाम झाला नसल्याचे भाजीविक्रेते विनोद म्हात्रे यांनी सांगितले.

# गौरा गणेश दर्शन




प्रमोद परशुराम जाधव, उलवे, नवी मुंबई



कमलाकर बाबाजी पाटील, केगाव, दांडा, उरण



गजानन ठाकूर, भेंडखळ, उरण



मयंक परेश शेटे, मिरची गल्ली, पनवेल



रश्मी नंदन ठाकूर, केगाव, उरण



उल्हास अरुण सोमासे, उलवे, नवी मुंबई

# सुधागडात अचानक १० जनावरे दगावली

## फणसवाडी येथील प्रकार; जिल्हा पशुसंवर्धन पथक दाखल

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील फणसवाडी येथे गेल्या काही दिवसांत अचानक १० जनावरे दगावली आहेत, तर पच दुभत्या गायी, पाच बैलांसह काही जनावरे आजारी आहेत. त्यामुळे पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



पशू दगावल्यामुळे पशुपालकांचे लाखोंचे नुकसान झाले. याबाबत ग्रामस्थांनी नांदगाव विभाग पशुधन पर्यवेक्षक प्रशांत वारगुडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी आजारी जनावरांवर उपचार करूनदेखील जनावरे दगावण्याचे प्रमाण कमी झाले नाही. त्यामुळे पशुपालक हवालदिल झाले आहेत.

माजी सरपंच आणि ग्रामस्थांनी जनावरे दगावल्याची खबर माजी जि. प. सदस्य सुरेश खैरे यांना सांगितली. त्यांनी तत्काळ जिल्हा पशुधन विकास अधिकारी श्याम कदम यांना संपर्क करून हे सर्व सांगितले. कदम यांनी ताबडतोब जिल्ह्यातील पशुधन अधिकारी प्रशांत कोकरे, विष्णू काळे तसेच पशुधन पर्यवेक्षक प्रशांत वारगुडे यांना फणसवाडी येथे पाठविले. त्यांनी आजारी जनावरांवर उपचार केले तसेच पशुपालकांना काय खबरदारी घ्यावी हेही सांगितले.

जिल्हा पशुधन विकास अधिकारी श्याम कदम, तालुका पशुधन अधिकारी सविता राठोड, पशुधन पर्यवेक्षक प्रशांत वारगुडे, चंद्रकांत बर्गे यांचे पथक रविवारी सकाळी १० वाजता फणसवाडी येथे दाखल झाले. या पथकाने आजारी जनावरांची पाहणी केली. त्या वेळी ग्रामस्थांबरोबर संवाद साधला असता आजारी जनावरांमध्ये जी लक्षणे दिसतात त्यावरून मृत जनावरांची हाडे चघल्यामुळे हळवा हा आजार होऊ शकतो. त्यातून जनावरांना पॅरेलिसिस होऊन दगावतात. तसे होऊ नये यासाठी पशुपालकांनी योग्य ती काळजी, खबरदारी घेतली तर जनावरे दगावण्याचे प्रमाण कमी होईल असे सांगण्यात आले तसेच ज्या पशुपालकांची जनावरे दगावली आहेत त्यांना नैसर्गिक आपत्ती निवारण कक्षाकडून आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही पथकातील अधिकाऱ्यांनी सांगितले.



# माणगावमध्ये भाजप युवा मोर्चातर्फे रक्तदान शिबिर

## युवकांसह नागरिकांचा प्रतिसाद



**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाड्याचे औचित्य साधून माणगाव येथील सरलादेवी मंगल कार्यालयात श्री साई ब्लड बँक एमजीएम हॉस्पिटलच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात अनेक नागरिकांनी रक्तदान करून उस्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन भाजप जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब महाले, तालुका सरचिटणीस युवराज मुंढे, नगरसेविका ममता थोरे, उपाध्यक्ष अशोक यादव, अश्विनी महाडिक, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष रितेश निवाते, दहिवली ग्रामपंचायत सदस्य योगेश पालकर, उत्तर भारतीय सेल अध्यक्ष आनंद राजभर, कार्यकर्ते राकेश जाधव, विद्यार्थी संघटन जिल्हा संपर्कप्रमुख वैभव कुलकर्णी, प्रियांका मेहता, निलम काळे, कौस्तुभ वझे, सौ. गोडबोले, परेश सांगले, शुभम धूपकर, प्रदीप लांगे, आकाश मढवी, निलेश राशीनकर, मंदार मढवी, अभिजित मोने, ओमकार गायकवाड व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.




या वेळी युवा नेते निलेश थोरे यांनी सांगितले की, रक्तदान हे श्रेष्ठदान असून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून ते महात्मा गांधी जयंतीपर्यंत सेवा पंधरवडा आयोजित केला जातो, ज्यामध्ये विविध लोकपयोगी कार्यक्रम राबवले जातात. त्याच पार्श्वभूमीवर माणगावमध्ये युवा मोर्चाच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराला तरुणांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. त्याबद्दल सगळ्यांना धन्यवाद देतो. दरवर्षी शिवजयंतीनिमित्त महारक्तदान शिबिराचे आयोजन करणारे पत्रकार सलीम शेख यांनी या शिबिरात आपले ४९वे रक्तदान केले. त्यामुळे त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. शिबिरासाठी नवरात्र मित्र मंडळाने विशेष सहकार्य केले.



**खोपोली : राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे वरची खोपोली येथे उद्यान व परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.** (छाया : जयवंत माडपे)

## रोह्यात पं. स.तर्फे श्रमदान

**रोहे : प्रतिनिधी**

स्वच्छता ही सेवा अंतर्गत एक तास श्रमदान हे अभियान रोहा पंचायत समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या अभियानासाठी गटविकास अधिकारी कुलदीप भोंगे, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, विस्तार अधिकारी सुनील गायकवाड, सहाय्यक प्रशासन अधिकारी दिनेश वारगे, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी परिसराची साफसफाई करण्यात आली तसेच स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, शासकीय कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, शाळा, अंगणवाडी आदी ठिकाणी श्रमदान करून हे अभियान राबविण्यात आले.



# आरोग्य व महिलाविषयक कायदे शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, रेड रिबिन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य व महिलाविषयक कायदे शिबिर झाले.




या शिबिरास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमकार पोटे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव अमोल शिंदे, अ‍ॅड. निलोफर शेख, जिल्हा सामान्य रुग्णालय डापकू विभागाचे संजय माने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.पल्लवी पाटील, प्रा. कैलास सिंग राजपूत, प्रा. पूजा पाटील, प्रा. पूजा म्हात्रे (महिला विकास कक्ष) तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय मोबाईल आयसीटी व्हॅन समुपदेशक रामेश्वर मुळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, प्लेबॉटोमिस्ट एच. एल. एल., रोहन रत्नाकर, डेंटल हायजेनिक कुंदन मसुले उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात कॉलेजचे प्राचार्य डॉ.ओमकार पोटे यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन का गरजेचे आहे तसेच आरोग्य जपणे ही काळाची गरज आहे याचे महत्त्व पटवून दिले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे यांनी विद्यार्थ्यांना सत्य घटनांवर आधारित कायदेविषयक गोष्टींचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी विशेष सूचित केले. अ‍ॅड. निलोफर शेख यांनी महिलाविषयक कायदेसंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण विभाग जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विधी स्वयंसेवक व सामाजिक कार्यकर्ता सुशील साईकर यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक शिबिराचे मार्गदर्शन करताना विविध कायद्यांची ओळख करून दिली.

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी एचआयव्ही म्हणजे काय त्याची कारणे व प्रतिबंधात्मक उपाय सांगून आरोग्यम धनसंपदा या उक्तीप्रमाणे प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी स्वतःच्या आरोग्याविषयी काळजी घेणे व सतर्क राहाणे आवश्यक असल्याचे सांगितले, तसेच भावी जीवनात यशस्वी होण्याकरिता मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात एकूण ९८ विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.कैलास सिंग राजपूत यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. पूजा म्हात्रे यांनी मानले.

## माणगावच्या वाचनालयास पुस्तकांची भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील उद्योजक विजयशेठ मेथा यांच्याकडून अनंत चतुर्दथीच्या दिवशी म्हसळा तालुक्यातील भापट गावातील राष्ट्र सेवा दलाच्या साने गुरुजी बालभवन वाचनालयास विविध प्रकारची वाचनीय पुस्तके भेट देण्यात आली.

पुस्तकांचे मानवी जीवनात अतिशय महत्त्व आहे. ग्रंथ हे गुरू असेही संबोधले जाते. त्यामुळेच वाचनालयात येणाऱ्यांना नवनवीन पुस्तके वाचायला मिळावीत यासाठी विजयशेठ मेथा यांनी पुस्तक भेट दिली.

याबद्दल विजयशेठ मेथा यांचे वाचनालय कमिटी, ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांकडून विशेष ऋण व आदर व्यक्त करण्यात आला.

# सुधागडात अज्ञात वाहनाच्या धडकेत जनावरे जखमी

**सुधागड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानंतर पुणे व मुंबईकडे परतणाऱ्या चाकरमान्यांनी माणगाव विळेमार्गे पाली खोपोली राज्य महामार्गावरून प्रवास केला. या वेळी रात्रीच्या सुमारास एका अज्ञात वाहनाने आतोने हद्दीमध्ये काही जनावरांना ठोकर दिली. यामुळे ही जनावरे जखमी झाली. यामध्ये खूप जखमी झालेल्या जनावरांबाबत अमर यादव यांनी येथील माजी सरपंच रोहन दगडे यांना माहिती दिली. त्यानंतर दगडे यांनी पशुवैद्यकीय चिकित्सक प्रशांत वारगुडे यांना बोलावून जनावरांवर उपचार करून घेतले.

अशा प्रकारे बेदरकारपणे वाहन चालवणाऱ्या वाहनचाकांमुळे जनावरांना हकनाक त्रास सहन करावा लागला.



# भजनभूषण गजाननबुवा पाटील यांचे शिष्य उभारणार स्मारक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील भजनभूषण स्व. गजाननबुवा पाटील-डिकसळकर यांच्या भव्य स्मारकाची मुहूर्तमेढ याच वर्षात उभी करण्याचा निर्धार गजाननबुवांच्या जयंती आणि पुण्यतिथी कार्यक्रमात करण्यात आला. अनंत चतुर्दशी हा बुवांचा जन्मदिवस असून त्यांचा मृत्यूदेखील याच दिवशी झाला होता.



गजाननबुवांच्या डिकसळ येथील समाधीस्थळी जयंती आणि पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास त्यांचे विविध ठिकाणांहून आलेले शिष्यगण उपस्थित होते. त्याचप्रमाणे गजाननबुवा पाटील स्मारक समितीचे अध्यक्ष दीपक बुवा कोरडे, सचिव रवींद्र लाड, कर्जत खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष मोहन पाटील, गजाननबुवांचे पुत्र प्रसादबुवा पाटील, कन्या सुचिता यांच्यासह विश्वास पाटील, भरत भंडारी, रूपेश पाटील, राम काकडे, चंद्रकांत भोईरबोरवली, रंभाजी थोरवे, कृष्णा म्हात्रे, तेजस भासे, दीपक घरत, संतोष घरत, दीपक घरत, सुरेश भोईर, किशोर गायकवाड, ईश्वर आरेकर आदी उपस्थित होते.

या वेळी शिष्यगणांनी मनोगत व्यक्त करीत गजाननबुवांच्या आठवणींना उजाळा दिला. स्मारक समितीचे अध्यक्ष दीपक करोडे यांनी गजाननबुवांचे स्मारक व्हावे यासाठी समिती प्रयत्न करीत आहेत, परंतु जागेची आणि आर्थिक अडचण निर्माण होत आहे. ती अडचणदेखील दूर होणार असल्याचे सांगितले. त्यामुळे आता हे स्मारक मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# मध्य रेल्वे चेहरा ओळखण्याची प्रणाली स्थानकांवर बसवणार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या स्थानकांत चेहरा ओळखण्याची प्रणाली असलेले कॅमेरे प्रवाशांची सुरक्षा सुधारणारे ठरणार असून या माध्यमातून गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यात येईल. मध्य रेल्वे ११७ स्थानकांवर चेहरा ओळखण्याची प्रणाली असलेले ३६५२ कॅमेरे बसवणार असून ३६४ स्थानकांवर व्हिडीओ पाळत ठेवणारे ६१२२ कॅमेरे बसवणार आहे.

मध्य रेल्वे रेलटेलच्या मदतीने एवन,ए,बी,आणि सी श्रेणीच्या स्थानकांवर निर्भया फंडातून ३६५२ सीसीटीव्ही कॅमेरे असलेली व्हिडीओ देखरेख प्रणाली स्थापित करणार आहे. या संदर्भातील सामंजस्य करार यापूर्वीच रेल्वे बोर्ड आणि रेलटेल यांच्यात झाला आहे. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चेहरा ओळखण्याची यंत्रणा, व्हिडीओ अ‍ॅनालिटिक्स, व्हिडीओ मॅनेजमेंट सिस्टीम असणार आहे. मध्य रेल्वेच्या ११७ स्थानकांवर तो बसवला जाणार आहे. याशिवाय मध्य रेल्वेच्या २४७ डी आणि ई श्रेणी स्थानकांवर २४७० कॅमेरे बसविणार आहेत.



मुंबई उपनगरीय नेटवर्कमधील सर्व स्थानकांसह मध्य रेल्वे स्थानकांवर लवकरच चेहरा ओळखणारी प्रणाली असलेले कॅमेरे सुसज्ज केले जाणार आहेत. हे तंत्रज्ञान तडीपार गुन्हेगारांना पकडण्यात आणि गर्दीच्या ठिकाणी व्यवस्थापित करण्यात मदत करणार आहे. मध्य रेल्वेने ११७ स्थानकांवर चेहरा ओळखण्याची प्रणाली असलेले कॅमेरे बसवण्याची योजना आखली आहे. त्या सर्वांमध्ये चार के तंत्रज्ञान असेल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, कुर्ला, ठाणे, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि कल्याण यांसारखी एकात्मिक सुरक्षा प्रणालीने सुसज्ज असलेली स्थानके वगळता मुंबई विभागातील सर्व स्थानके समाविष्ट होतील.

कॅमेऱ्यांमधून गोळा केलेला डेटा आयपी नेटवर्कद्वारे मॉनिटरिंग स्टेशनवर आणि पुढे एकात्मिक नियंत्रण कमांड सेंटरमध्ये प्रसारित केला जाईल. या प्रणालीमुळे ११७ स्थानके सतत डिजिटल देखरेखीखाली राहतील. हे कॅमेरे डेटाबेसमध्ये ज्याचा चेहरा संग्रहित केला आहे ती व्यक्ती ओळखू शकतात आणि स्थानकात प्रवेश करताच ओळखीच्या गुन्हेगारांच्या उपस्थितीबद्दल प्रशासनाला ताबडतोब सूचना देतात.

## नमुना एन. डी.

**(नियम ९२ (३) पहा)**

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. NP/MH/ 46/012023/80509 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 46 H 2223 चे मालक नानासाहेब शामराव लेंडवे यांचे दि. १७/०६/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी, अर्चना नानासाहेब लेंडवे, पत्ता : रा. लेंडवे,चीचले, सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०५ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव :** अर्चना नानासाहेब लेंडवे
पत्ता :लेंडवे,चीचले, सोलापूर, महारष्ट्र- ४१३३०५

## शुध्दीपत्रक

शनिवार दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी च्या दैनिक रामप्रहर मध्ये पान क्रमांक दोनवर अ‍ॅडव्होकेट ए. के. भांदुर्गे यांची पब्लिक नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यात N. D - ०६/११/२०२३ च्या खाली नजरचुकीने N.8/D असे छापण्यात आले आहे. परंतु ते Ex. 8/D असे वाचण्यात यावे.

# विद्या रामराजने इतिहास रचला

## ३९ वर्षांनंतर पीटी उषाच्या विक्रमाशी बरोबरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या विद्या रामराजने इतिहास रचला आहे. तिने महान ॲथलिट पीटी उषाच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. विद्याने ४०० मीटरची शर्यत ५५.४३ सेकंदात पूर्ण केली. यासह तिने महिलांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत पीटी उषाच्या ३९ वर्षांपूर्वीच्या राष्ट्रीय विक्रमाची बरोबरी केली. १९८४मध्ये उषाने ही शर्यत ५५.४२ सेकंदात पूर्ण केली होती. आता विद्यानेही हे केले आहे. यापूर्वी विद्याचा सर्वोत्तम विक्रम ५५.४३ सेकंद होता. ती बहरीनच्या अमीनत ओये जमालसह हीट १ मधून थेट अंतिम फेरीसाठी पात्र ठरली.

दुसऱ्या हीटमध्ये कवेराम सिंचल रवीने ५८.६२च्या वेळेसह चौथ्या आणि हीट दोनमध्ये सर्वांत कमी स्थान मिळवले आणि पदक फेरीसाठी पात्र ठरू शकला नाही. तिने एकूण दहावे स्थान पटकावले. पुरुषांच्या उंच उडीमध्ये, जेसी संदेश आणि अनिल सर्वेश कुशारे अंतिम फेरीत पोहचण्यात यशस्वी झाले असले तरी या दोघांनाही २.२६ मीटरचे स्वयंचलित पात्रता चिन्ह उडी मारता आले नाही.

जेसीने अ गटात २.१० मीटरच्या उडीसह सहावे, तर अनिलने २.१० मीटरच्या उडीसह गट ब मध्ये चौथे स्थान पटकावले. दोन्ही खेळाडूंनी दहावे आणि अकरावे स्थान मिळवले आणि पदक फेरीसाठी पात्र ठरलेल्या अव्वल १२ खेळाडूंमध्ये ते स्थान मिळवले.

विद्याची बहीण नित्याही आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होत आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत एकत्र भाग घेणाऱ्या विद्या आणि नित्या या भारतातील पहिल्या जुळ्या बहिणी आहेत. नित्याचा जन्म विद्याच्या एक मिनिट आधी झाला होता. त्यांच्या वडिलांनी एकदा त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी कोईम्बतूरच्या रस्त्यावर ऑटो-रिक्षा चालवली. नित्या महिलांच्या १०० मीटर अडथळा शर्यतीत, तर विद्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत भाग घेते.

### खडतर प्रवास अन् यश

विद्याने २०१४मध्ये पदक जिंकले होते, पण पुढचा प्रवास खूप कठीण होता. प्रशिक्षक नेहपाल सिंग राठोड यांच्या मदतीने तिने पुन्हा कठोर परिश्रम केले आणि २०२१च्या फेडरेशन कपमध्ये ४०० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक जिंकले. यानंतर तिने ओपन नॅशनलमध्ये दुहेरी यश संपादन केले आणि त्यामुळे विद्याला रेल्वेत नोकरी मिळाली. पलक्कड विभागाची वरिष्ठ लिपिक झाल्यानंतर कुटुंबाची स्थिती बरीच सुधारली. त्यानंतर नित्या चेन्नईतील आयकर विभागात रूजू झाली आणि आता चेन्नईमध्ये मल्टी-टास्किंग स्टाफ म्हणून तैनात आहे.

## भारतीय पुरुष हॉकी संघाची विजयी घोडदौड

**बीजिंग : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील हॉकी स्पर्धेत भारतीय पुरुष संघाने बांगलादेशचा १२-० असा पराभव केला आहे. भारताने सोमवारी (दि. २) पुल 'ए'मधील शेवटच्या सामन्यातही चमकदार कामगिरी करीत सलग पाचवा विजय साकारला.

या विजयासह भारतीय संघ पुल 'ए'मध्ये अव्वल स्थानावर राहिला. भारत आता ३ ऑक्टोबरला उपांत्य फेरीत यजमान चीनशी दोन हात करू शकतो. या स्पर्धेत भारत आतापर्यंत अपराजित आहे.

## जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत पनवेल महापालिका आयोजित जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धा नुकतीच खारघर येथे झाली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

उच्च माध्यमिक विद्यालयातील क्षितिज प्रमोद आगलावे याने प्रथम, तर प्रेम मनोहर पाटील याने द्वितीय क्रमांक मिळविला. या दोन्ही विद्यार्थ्यांची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.





या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : भाजप युवा नेते व माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील सल्लागार असलेल्या साईनाथ मित्र मंडळाच्या वतीने गौरा गणपती उत्सव आयोजित करण्यात आला आहे. सोबत मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, भाविक.**

## ...तर भारतीय संघाला वर्ल्डकप जिंकण्यापासून कुणीही रोखू शकत नाही

### इंग्लंडच्या स्टुअर्ट ब्रॉडचा विश्वास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



यंदाची वर्ल्डकप स्पर्धा भारतीय संघ मायदेशात खेळणार असल्याने त्यांच्या घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा मिळणार आहे. अशा वेळी भारतीय संघाला स्पर्धा जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. केवळ भारतीय चाहतेच नव्हे, तर इंग्लंडचा वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉड यालाही या स्पर्धेसाठी भारतीय संघच दावेदार वाटत आहे. भारतीय संघाला या स्पर्धेत कुणीही रोखू शकत नाही, असे त्याने म्हटले आहे.

क्रिकेट चाहत्यांना वनडे वर्ल्डकपचे वेध लागले आहेत. सराव सामने पावसाने उधळून लावले असले तरी मूळ वर्ल्डकप ५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. या स्पर्धेत भारताचा सलामीचा सामना ८ ऑक्टोबरला तुल्यबळ ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. या सामन्यासाठी आणि संपूर्ण स्पर्धेसाठी भारतीय संघाने जोरदार तयारी केल्याचे दिसत आहे.

इंग्लंडचा संघ हा गतविजेता आहे. त्यामुळे त्यांनी जर आपले विश्वविजेतेपद कायम राखण्यात यश मिळवले, तर ही त्यांच्यासाठी एक अविश्वसनीय कामगिरी ठरू शकेल, पण सध्या माझे मन मला सांगतेय की, जर भारतीय संघाने या स्पर्धेत प्लॅनिंग करून त्यानुसार योग्य खेळ केला, तर टीम इंडियाला रोखणे कोणत्याही संघासाठी निव्वळ अशक्य आहे. भारतीय पिचवर मोठ्या धावसंख्या उभारल्या जातात. अशा परिस्थितीत जोस बटलरच्या नेतृत्वाखालील संघापुढे मोठं आव्हान असणार आहे, मात्र त्यातही भारतीय संघ हा सध्या वन डे क्रमवारीत अव्वल आहे आणि मायदेशात खेळणार आहे. त्यामुळे त्यांच्या संघाविरोधात योजना आखणे खूपच कठीण जाईल, असे ब्रॉड म्हणाला.

२०११पासून एक गोष्ट सातत्याने दिसून आली आहे की जो संघ यजमान असतो त्या संघाला विश्वविजेतेपद मिळते. २०११मध्ये भारताने भारतात वर्ल्डकप जिंकला. २०१५मध्ये ऑस्ट्रेलियाच्या संघाने ऑस्ट्रेलियात वर्ल्डकप जिंकला. इंग्लंडने २०१९मध्ये इंग्लंडमध्ये वर्ल्डकप जिंकला. आता ही परंपरा कायम राखली जाऊ शकते. अशा वेळी भारतीय संघ हा अतिशय प्रबळ दावेदार आहे, असे मत ब्रॉडने व्यक्त केले.

## एशियाडमध्ये भारतीय पुरुष संघाची आज नेपाळशी लढत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीचे सामने ३ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. भारतीय पुरुष क्रिकेट संघही मंगळवारी उपांत्यपूर्व फेरीने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. उपांत्यपूर्व फेरीत भारताचा सामना नेपाळशी होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी ६.३०पासून खेळवला जाईल.

आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारताचे नेतृत्व ऋतुराज गायकवाडकडे सोपवण्यात आले आहे. या संघात तिलक वर्मा, राहुल त्रिपाठी, रिंकू सिंग आणि यशस्वी जैस्वाल यांचा समावेश आहे. गोलंदाजांमध्ये रवी बिश्नोई, मुकेश कुमार, आवेश खान, आकाश दीप आणि अर्शदीप सिंग यांचा समावेश आहे. वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद आणि शिवम दुबे यांची अष्टपैलू खेळाडूंमध्ये निवड झाली आहे. जितेश शर्मा आणि प्रभसिमरन सिंग यांच्या रूपाने संघात दोन यष्टिरक्षक आहेत.

## भारतीय महिला हॉकी संघ उपांत्य फेरीत दाखल

**बीजिंग : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला हॉकी सांघिक स्पर्धेत रविवारी भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यात खेळवण्यात आलेला सामना १-१ असा बरोबरीत सुटला. या निकालानंतर भारत उपांत्य फेरीत पोहचला आहे.

कोरियाने सामन्यात सुरुवातीला आघाडी घेतली. १२व्या मिनिटाला चो येजिनने पेनल्टी स्ट्रोकवर पहिला गोल केला. तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताला पहिला गोल मिळाला. दीप ग्रेस एक्काने ४४व्या मिनिटाला अप्रतिम गोल केला. या गोलच्या जोरावर भारताने सामना १-१ असा बरोबरीत सोडवला. यानंतर सामन्यात दोन्ही संघांकडून एकही गोल झाला नाही.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com